SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०७.०८.२०२६ | अंक नं. ११० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
शू पॅलेस सारडागल्ली, अ.नगर मो : 9881531536

स्मार्ट असो वा मार्ट..मिळ असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹ 50000/- सोने खरेदीवर
₹ 20000/- चांदी खरेदीवर
₹ 5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹ 5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
मजुरीही सर्वात कमी.
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹999/- दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

# शहराचा 'विकास आराखडा' प्रसिद्ध होण्याआधीच 'आरक्षणांचा खेळ' सुरू

**नगरसेवकांना संपूर्ण नकाशे-अभिलेख न दिल्याचा आरोप; उच्चस्तरीय चौकशीची शिवसेनेची मागणी**

नगर – शहराच्या पुढील अनेक वर्षांच्या विकासाची दिशा ठरविणाऱ्या प्रारूप विकास आराखड्यावरून अहिल्यानगर महानगरपालिकेत वाद निर्माण झाला आहे. ३० जुलै रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. २३ अंतर्गत प्रारूप विकास योजना प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. मात्र संपूर्ण विकास आराखडा, अधिकृत नकाशे आणि आवश्यक तांत्रिक अभिलेख नगरसेवकांना उपलब्ध करून न देता प्रस्ताव मंजूर केल्याचा आरोप शिवसेनेचे नगरसेवक तथा गटनेते दत्तात्रय कावरे यांनी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी कावरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री आणि नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे.

कावरे यांच्या म्हणण्यानुसार, विकास आराखडा हा केवळ प्रशासकीय दस्तऐवज नसून शहरातील जमीन वापर, निवासी व व्यावसायिक क्षेत्रे, सार्वजनिक आरक्षणे, रस्ते, उद्याने, शाळा, रुग्णालये, बाजारपेठा, नदी-नाले, वाहतूक व्यवस्था तसेच नागरिकांच्या मालमत्तांवर दूरगामी परिणाम करणारी बाब आहे. त्यामुळे अशा महत्त्वपूर्ण प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी नगरसेवकांना संपूर्ण आराखड्याचा अभ्यास करण्याची पुरेशी संधी मिळणे आवश्यक होते.

### तीन पानांत शहराचा विकास आराखडा?

सभेपूर्वी नगरसेवकांना संपूर्ण प्रारुप योजना, अधिकृत जमीन वापर नकाशे, आरक्षणनिहाय माहिती, नवीन आरक्षणे, बदललेली अथवा वगळण्यात आलेली आरक्षणे, प्रस्तावित रस्ते, सर्वेक्षण आणि तांत्रिक अहवाल उपलब्ध करून देण्यात आले नसल्याचे कावरे यांनी म्हटले आहे. उलट सभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर केवळ तीन पानी संक्षिप्त माहितीपत्रक देण्यात आले. त्या माहितीपत्रकावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी (पुढील मजकूर पान २ वर)

शिखरे यशाची आपण अशीच चढत राहो..
कीर्ती तुमची आसमंतात पसरत राहो..
विजयाची ललकारी तुमची दाही दिशा गुंजत राहो...
अ‍ॅड.डॉ. राजेंद्रजी अनभुले व अ‍ॅड. महेशजी तवले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा
अ‍ॅड. डॉ. राजेंद्रजी डी.अनभुले L.L.M. Gold Medalist Mo. 9822010099
अ‍ॅड. महेशजी तवले चेअरमन माऊली पतसंस्था Mo. 9822222302
शुभेच्छुक
अ‍ॅड. कुंदा एस. दांगट | अ‍ॅड.अक्षय एस. दांगट व समस्त दांगट परिवार

आनंद तीर्थ
श्री गुरु आनंद जन्मोत्सव सप्ताह
राष्ट्रसंत आचार्य सम्राट
प. पू. श्री आनंदऋषिजी म.सा.
का उनकी पावन कर्मभूमि पर भव्य
जन्मोत्सव समारोह
6 से 14 अगस्त
समर्पण चातुर्मास...
समर्पण-सर्व कल्याण
रविवार 9 अगस्त : प्रातः 7:00 से 10:00 बजे तक
सपरिवार 2.5 करोड़ नवकार महामंत्र जाप
एवं 25,000+ कंठों से एक साथ मंत्रघोष
प्रमुख वक्ता - मा.श्री. सुधीर कुमार कोचर (IAS) उप-सचिव, मुख्यमंत्री, म.प्र.
बुधवार 12 अगस्त आनंद पौषध | तपस्वियों की सामूहिक भावा दोपहर 2:00 - 4:00 बजे | भक्ति संध्या रात 8:00 बजे
सोमवार 10 अगस्त सुबह 11:00 बजे से दोपहर 1:30 बजे तक आनंद एकासन
आनंद दया
शुक्रवार 14 अगस्त : प्रातः 8:00 बजे पारणोत्सव
गुरुवार 13 अगस्त आनंद जन्मोत्सव गुरु भक्ति एवं 3600+ अट्ठाई प्रत्याख्यान
आइए, श्रद्धा और समर्पण के साथ गुरु जन्मोत्सव को जीवन का अविस्मरणीय उत्सव बनाएं।
आनंद तीर्थ ट्रस्ट, अहिल्यानगर | समर्पण चातुर्मास समिति विश्वस्त मंडल
- प्रमुख उपस्थिति -
मा. राधाकृष्ण विखे पाटील पालकमंत्री, अहिल्यानगर
मा. संग्राम अरुणकाका जगताप आमदार, अहिल्यानगर
स्थान : आनंद तीर्थ समवशरण, N.N सथ्था कॉलेज परिसर, आनंदधाम, अहिल्यानगर
चातुर्मास प्रमुख लाभार्थी
श्री. सौरभ प्रमिलाताई हेमराजजी बोरा
सौ. राखी, तनिष, तनय, अरिहंत,
श्री. पराग, सौ. सोनम, आरव, श्रेया एवं बोरा परिवार
PMT MACHINES LIMITED
SAURABH BORA GROUP OF COMPANY

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# आकडा टाकून वीजचोरी करणाऱ्यावर गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील भोरवाडी येथे महावितरणच्या पथकाने केलेल्या कारवाईत एका ग्राहकाने गेल्या १२ महिन्यांपासून ६९२ युनिट वीज चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी कनिष्ठ अभियंता संदीप बराट यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, आरोपी सागर भिवसेन भोर याच्याविरुद्ध भारतीय वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणचे कनिष्ठ अभियंता संदीप बराट आणि त्यांचे इतर कर्मचारी अरुण शिंदे, दत्तात्रय सातपुते, ऋषिकेश एकशिंगे व संजय कुटे हे सर्वजण भोरवाडी येथे वीज चोरी शोधण्यासाठी गेले होते. कारवाईदरम्यान आरोपी सागर भिवसेन भोर याच्या घरी जाऊन पथकाने आपले ओळखपत्र दाखवले आणि वीज जोडणी तपासली.

तपासणी केली असता, आरोपीने त्याच्या घरच्या बाजूला असलेल्या एल. टी. पोलच्या फेझ व न्यूट्रलला आकडा टाकून काळ्या रंगाची अंदाजे ३० फूट लांबीची सर्व्हिस केबल वापरून घरामध्ये अनधिकृत वीज पुरवठा घेतल्याचे निदर्शनास आले. आरोपीने मागील १२ महिन्यांपासून महावितरण कंपनीची ६९२ युनिटची वीज चोरी केली असून, याची किंमत १२,१५५ रुपये इतकी आहे. तसेच कलम १५२ प्रमाणे तडजोड रक्कम २,००० रुपये धरून एकूण १४,१५५ इतक्या रकमेची वीज चोरी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# मावा-सुगंधी तंबाखू विक्रेत्यांवर पोलिसांची छापेमारी; तीन ठिकाणी कारवाई; २३.२९ लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर - अवैध धंद्यांवर सुरू असलेल्या कारवाईचा धडाका कायम ठेवत स्थानिक गुन्हे शाखेने ६ ऑगस्ट रोजी एमआयडीसी व तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तीन ठिकाणी छापे टाकून अवैध मावा व सुगंधी तंबाखू तयार करून विक्री करणाऱ्या अड्ड्यांवर मोठी कारवाई केली. या कारवाईत ८ आरोपींविरूध्द तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण २३ लाख २९ हजार ९५० रूपयांचा मावा, सुगंधी तंबाखू, सुपारी व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.



एमआयडीसी व तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत मावा व सुगंधी तंबाखू विक्रेत्यांवर कारवाई केल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती संकलित करून कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, अतुल लोटके, रमीझराजा आत्तार, सागर ससाणे, रणजीत जाधव, बिरप्पा करमल, विकास साळवे, दीपक जाधव, अमृत आढाव, निळकंठ कारखिले आणि भगवान सानप यांच्या पथकाने ही कारवाई केली. माहितीच्या आधारे एमआयडीसी व तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तीन वेगवेगळ्या ठिकाणी पंचांसमक्ष छापे टाकले.

या कारवाईत मोठ्या प्रमाणात तयार मावा, सुगंधी तंबाखू, सुपारी तसेच अन्य साहित्य जप्त करण्यात आले. शुभम दत्तात्रय हजारे (रा. सरोदेमळा,केडगाव) व जितू मालपाणी (रा. छत्रपती संभाजीनगर) यांच्याविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. तर आदित्य अरूण सुतार, प्रमोद शरद गायकवाड, गणेश बाळासाहेब कोलते (सर्व रा. बोल्हेगाव), कय्युम अयुब शेख (रा. मुकुंदनगर), अक्षय कुंडलीक निकाळजे (रा. बोल्हेगाव) व अस्लम शेख (रा. माळीवाडा) यांच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### दारू, जुगारावरही कारवाई

अवैध दारू, जुगार आणि मावा विक्रीविरोधातही स्थानिक गुन्हे शाखेने मोहीम राबवत जामखेड, सुपा, एमआयडीसी आणि तोफखाना पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील १० ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत १० गुन्हे दाखल करण्यात आले असून, दोन लाख ९७ हजार २६० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अवैध दारूविक्रीचे जामखेड येथे दोन, सुपा येथे दोन, एमआयडीसी येथे तीन आणि तोफखाना येथे एक, जुगाराचा तोफखाना पोलीस ठाण्यात एक तर मावा व सुगंधी तंबाखू विक्रीप्रकरणी जामखेड येथे एका गुन्हा दाखल करण्यात आला.



गहाळ झालेले ३५ मोबाईल फोन शोधून मूळ मालकांना सुपूर्द करताना सायबर पोलिसांचे पथक.

# सायबर पोलिसांनी शोधले गहाळ झालेले ३५ मोबाईल फोन

नगर - अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील नागरिकांचे विविध कारणांमुळे गहाळ झालेले तब्बल ३५ मोबाईल फोन शोधून काढण्यात सायबर पोलीस ठाण्याला मोठे यश मिळाले आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी ही कामगिरी केली असून, शोधण्यात आलेले हे सर्व मोबाईल फोन त्यांच्या मूळ मालकांच्या सुपूर्द करण्यात आले आहेत.

परत करण्यात आलेल्या या मोबाईल फोनची एकूण अंदाजे किंमत साडेतीन ते चार लाख रुपये इतकी आहे. आपले मोबाईल हरवल्यामुळे ते परत मिळण्याची सर्व आशा नागरिकांनी सोडली होती. मात्र, सायबर पोलिसांनीअतिशय सुरक्षितपणे आणि सन्मानाने मोबाईल परत केल्यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद पाहायला मिळाला. या यशस्वी कामगिरीबद्दल नागरिकांनी अहिल्यानगर पोलीस दलाप्रती मनःपूर्वक आभार व्यक्त करून समाधान व्यक्त केले आहे.

सदरची ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन व अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या नेतृत्वाखाली सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाने पार पाडली आहे. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक सुदाम काकडे, पोलीस अंमलदार सोमनाथ आठरे, आप्पासाहेब हिंगे, गणेश पाटील तसेच सायबर पोलीस ठाण्यातील इतर अंमलदारांनी सहभाग घेतला होता.

# घर फोडून ५ तोळे सोने व अर्धा किलो चांदीचे दागिने चोरट्यांनी केले लंपास

### गायके मळा परिसरातील घटना; पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरु

नगर - शहरातील मोरचूदनगर परिसरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सुमारे तीन लाख रुपये किंमतीचे ५ तोळे सोने आणि अर्धा किलो चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कल्याणी मंगेश टिक्कल (रा. गायके मळा, मोरचूदनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ जुलै रोजी सकाळी ९ ते ६ ऑगस्ट रोजी सकाळी ७ या कालावधीत ही चोरी झाली. अज्ञात चोरट्याने घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील लॉकरमधून सुमारे ५० ग्रॅम वजनाचे विविध प्रकारचे सोन्याचे दागिने आणि सुमारे ५०० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या वस्तू चोरून नेल्या. चोरीस गेलेल्या ऐवजाची एकूण किंमत सुमारे तीन लाख रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक समाधान सोळंके पुढील तपास करत आहेत.

# अनेकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोघांना पुणे विमानतळावर पकडले

### देशभरातील गुंतवणूकदारांची केलीय कोट्यावधींची फसवणूक, आरोपींवर १० गुन्हे दाखल

नगर - गुंतवणुकीवर ५ ते १५ टक्के आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून अनेक गुंतवणूकदारांची कोट्यवधी रूपयांची फसवणूक करणाऱ्या दोन पसार संशयित आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुणे विमानतळावरून अटक केली. विमानाने परदेशात अथवा अन्यत्र पसार होण्याच्या तयारीत असतानाच ही धडक कारवाई करण्यात आली. आरोपींवर अहिल्यानगरसह महाराष्ट्र व इतर राज्यांमध्ये फसवणुकीचे तब्बल १० गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यानुसार फिर्यादी योगी महेंद्र सबलोक (रा. कोठला रोड, सर्जेपुरा) व इतर गुंतवणूकदारांना रिजॉईस इव्हेंट ऑर्गनायझर कंपनीच्या व्यवसायवाढीसाठी गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करण्यात आले होते. यासंदर्भात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. दरम्यान, या गुन्ह्यातील पसार संशयितांचा शोध घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, अंमलदार शाहीद शेख, फुरकान शेख, दीपक जाधव, चिमा काळे यांचे पथक संशयितांचा शोध घेत होते.तपासादरम्यान संशयित पुण्यात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर ते पुणे विमानतळावरून विमानाने पसार होण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाल्यावर पथकाने पुणे विमानतळ पोलिसांच्या मदतीने सापळा रचला. या कारवाईत राहुल दर्शन जगताप (वय ४४) आणि पायल पी. सॅन्युअल उर्फ पायल राहुल जगताप (वय ४०, रा. पुणे) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या तपासात या आरोपींविरूध्द अहिल्यानगरमधील तोफखाना व एमआयडीसी पोलीस ठाण्यांसह मुंबई, ठाणे, मध्यप्रदेश, दिल्ली आणि हरियाणा येथे गुंतवणुकीवर जादा परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याचे एकूण १० गुन्हे दाखल आहेत. तसेच काही प्रकरणांमध्ये एमपीआयडी कायद्यांतर्गतही गुन्हे नोंदविण्यात आले असल्याचे पोलिसांनी सांगितले.


## ओंकार मारवाडे यांचे दु:खद निधन



नगर - श्रमिकनगर येथील रहिवासी ओंकार भगवान मारवाडे (वय २९) यांचे ६ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, बहिण असा परिवार आहे.

## अजीज बशीर सय्यद यांचे निधन



नगर - मुकुंदनगर येथील रहिवासी अजीज बशीर सय्यद (वय ७९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी लालटाकी येथील जलाल शाह बुखारी कब्रस्थानमध्ये करण्यात आला. कै. अजीज बशीर सय्यद हे रयत शिक्षण संस्थेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या मागे एक मुलगा, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. फिरोज सय्यद यांचे ते वडील होत.

## गुलाबबाई कोठारी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - केडगाव, राजमाता हॉस्पिटल मागील रहिवासी गुलाबबाई पन्नालाल कोठारी (माकावाले, वय ७९) यांचे ७ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. झुंबरलाल, सुरेशलाल कोठारी यांच्या त्या मातोश्री होत. सतिश कोठारी (लाईटवाला) यांच्या त्या आजी होत.

## राजेश जोशी यांचे दु:खद निधन



नगर - आडते बाजार, वंजारगल्लीतील रहिवासी राजेश रमेश जोशी (पप्पूभाई, वय ५०) यांचे ६ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, ५ भाऊ, भावजय, पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे. उमेश, सचिन, अजय, नितीन, किसन जोशी यांचे ते बंधू होत. शिवसेना दक्षिण समितीचे ते विभागप्रमुख होत.

## सरस्वतीबाई दोंड यांचे दु:खद निधन



श्रीरामपूर - तालुक्यातील निपाणीवडगाव येथील कै.गं.भा. सरस्वतीबाई शामराव दोंड (वय ९२) यांचे दु:खद निधन झाले.

त्यांचे पश्चात दोन मुले, पाच मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी रावसाहेब दोंड व शिवाजी दोंड यांच्या त्या मातोश्री होत.

# ९ ऑगस्टचा उपवर्गीकरणविरोधी मोर्चा ठरल्याप्रमाणेच होणार

### स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाचा निर्धार

नगर - अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात येत्या ९ ऑगस्ट क्रांती दिनी आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय मोर्चा कोणत्याही परिस्थितीत ठरल्याप्रमाणेच पूर्ण ताकदीने काढण्यात येणार असल्याची माहिती स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्या वतीने देण्यात आली आहे.



९ ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात नियोजित मोर्चा काढण्याचा निर्धार स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्यावतीने करण्यात आला.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, काही सोशल मीडिया ग्रुपवर हा मोर्चा स्थगित झाल्याच्या खोडसाळ पोस्ट प्रसारित केल्या जात आहेत. मात्र, हा मोर्चा कोणत्याही एका व्यक्तीचा नसून संपूर्ण समाजाचा आहे आणि तो स्थगित करण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे समाजबांधवांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. ९ ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून दिवंगत ज्येष्ठ नेते अशोकराव गायकवाड यांनी या मोर्चाचे नियोजन केले होते. त्यामुळे त्यांच्याच संकल्पानुसार ९ ऑगस्ट रोजी मोर्चा काढणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही यावेळी सांगण्यात आले.

हा मोर्चा कोणत्याही समाजाच्या विरोधात नसून अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाच्या निर्णयाला कारणीभूत ठरलेल्या भाजप-आरएसएसच्या धोरणांच्या विरोधात आहे. अनुसूचित जाती समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. तसेच अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन विद्यमान १३ टक्के आरक्षण वाढवून २५ टक्के करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी या मोर्चातून करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

मोर्चाच्या तयारीला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मोठ्या संख्येने भीमसैनिक सहभागी होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या पोस्टकडे दुर्लक्ष करून उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, कापड बाजार परिसरात रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे मोर्चाच्या पारंपरिक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून सुरु होऊन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, माळीवाडा, महात्मा फुले पुतळा, आशा टॉकीज चौक, माणिक चौक, अर्बन बँक, नवी पेठ, चितळे रोड, दिल्ली गेट मार्गे नीलक्रांती चौक येथे समारोप होणार आहे. या मोर्चामध्ये लॉंग मार्चचे प्रणेते सिद्धार्थ शिंगारे, भीम टायगरचे राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब शेळके, राजूभाऊ थाटे, सिद्धार्थ सुरडकर यांच्यासह विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. शहर व जिल्ह्यातील सर्व भीमसैनिक, आंबेडकरी अनुयायी आणि बौद्ध समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शहराचा 'विकास आराखडा' प्रसिद्ध होण्याआधीच 'आरक्षणांचा खेळ' सुरू

*(पान १ वरुन)*

दिनांक, जावक क्रमांक किंवा प्रमाणितीही नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

### 'आरक्षण काढून देतो'च्या चर्चेमुळे संशय

कावरे यांनी निवेदनात आणखी गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. प्रारूप विकास योजना अधिकृतरीत्या प्रसिद्ध होण्यापूर्वीच काही नगरसेवक अथवा त्यांच्याशी संबंधित मध्यस्थ जमीनधारक आणि विकासकांना भेटून जमिनीवरील आरक्षण काढून देतो, बदलून देतो किंवा अनुकूल जमीन वापर करून देतो अशा स्वरूपाची आश्वासने देत असल्याच्या तक्रारी निदर्शनास आल्याचे त्यांनी म्हटले आहे. या आरोपांची सत्यता स्वतंत्र चौकशीतून पडताळण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे. संपूर्ण आराखडा नगरसेवकांनाही उपलब्ध झाला नसताना प्रस्तावित आरक्षणांची माहिती निवडक व्यक्तींना आधीच कशी मिळाली, अप्रकाशित माहिती बाहेर गेली का आणि त्यामागे कोणते आर्थिक अथवा खासगी हितसंबंध आहेत का, याचाही शोध घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

### ठरावाच्या पुढील कार्यवाहीला स्थगिती द्या

३० जुलैच्या ठरावाच्या आधारे होणाऱ्या पुढील कार्यवाहीला तात्पुरती स्थगिती द्यावी, संपूर्ण विकास आराखडा व अधिकृत नकाशे शासनाने मागवून तपासावेत, लागू कायदे व नगररचना नियमांचे पालन झाले आहे का याची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी कावरे यांची प्रमुख मागणी आहे.

तसेच प्रत्येक नगरसेवकाला संपूर्ण प्रारूप विकास योजना व प्रमाणित अभिलेख उपलब्ध करून किमान १५ दिवस अभ्यासासाठी देण्यात यावेत आणि त्यानंतर स्वतंत्र पुनर्विचार सभा आयोजित करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. कथित आर्थिक व्यवहार, अनुचित दबाव किंवा पदाचा गैरवापर झाल्याचे चौकशीत आढळल्यास प्रकरण सक्षम तपास यंत्रणेकडे सोपवून संबंधितांविरुद्ध कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, असेही कावरे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# केडगाव येथे जुन्या वादातून तरुणावर प्राणघातक हल्ला

### तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - केडगाव परिसरात जुन्या वादातून एका तरुणावर लाकडी दांडका, लोखंडी कडे आणि धारदार हत्याराने हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तन्मय रंगनाथ मगर (रा. दत्त चौक, भूषणनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास शिवांजली लॉन परिसरात ही घटना घडली. या प्रकरणी रोहित बनसोडे (रा. दुधसागर सोसायटी, केडगाव) तसेच त्याच्या दोन अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी घरी जात असताना आरोपींनी त्याला अडवून शिवीगाळ केली. त्यानंतर लाकडी दांडक्याने मारहाण केली. लोखंडी कड्याने डोळ्याजवळ वार करून जखमी केले. तसेच धारदार हत्याराने पाठीवर वार करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. जखमी तरुणाने उपचार घेतल्यानंतर कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# बंद घर फोडून रोख रक्कम, दागिने व कागदपत्रांसह ३० हजारांचा ऐवज लंपास

नगर - शहरातील चैत्रबन कॉलनी परिसरात बंद घर फोडून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने आणि महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मंदा सतिष जगताप (रा. चैत्रबन कॉलनी, गुलमोहर रोड, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जुलै रोजी सायंकाळी ७ ते ४ ऑगस्ट रोजी सकाळी ९ या कालावधीत ही चोरी झाली. अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील १५ हजार रुपये रोख रक्कम, सुमारे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे टॉप्स, सुमारे २० ग्रॅम वजनाचे चांदीचे गणपतीचा मुकुट, दुर्वा व मोदक तसेच घरातील महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेली. चोरीस गेलेल्या ऐवजाची एकूण किंमत सुमारे ३० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर पुढील तपास करत आहेत.

# देहरे येथे घरातून दागिन्यांची चोरी

नगर - नगर तालुक्यातील देहरे गावात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने, मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण ७८ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संभाजी बाबू जाधव (रा. देहरे, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ ऑगस्ट रोजी रात्री ११ ते ३ ऑगस्ट रोजी पहाटे ५ या कालावधीत ही चोरी झाली. अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने, रोख रक्कम, भ्रमणध्वनी तसेच अशोक नंदकिशोर जाधव यांचेही दागिने व रोख रक्कम चोरून नेली.

चोरीस गेलेल्या ऐवजात सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने, मोबाईल आणि एकूण ३५ हजार रुपये रोख रकमेचा समावेश आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### जेवणानंतर गूळ खाण्याचे आरोग्यदायी फायदे

भारतात जेवण झाल्यानंतर गुळाचा खडा खाण्याची परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आली आहे. ही केवळ चवदार सवय नसून, यामागे मोठे वैज्ञानिक आणि आरोग्यदायी रहस्य आहे. गुळात लोह, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात. जेवणानंतर गूळ खाण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे पचनक्रिया सुधारणे. गुळामुळे शरीरात पचन रसांचे उत्सर्जन वाढते, ज्यामुळे अन्न लवकर पचते. यामुळे अपचन, गॅस, ॲसिडिटी आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होण्यास मदत होते. तसेच, गूळ शरीर डिटॉक्स करण्याचे काम करतो. तो यकृत आणि रक्त स्वच्छ ठेवतो, ज्यामुळे त्वचेवर चमक येते. गुळातील भरपूर लोह रक्ताची कमतरता (ॲनिमिया) दूर करतो, तर इतर खनिजे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. जेवणानंतर गोड खाण्याची इच्छा झाल्यास साखरेऐवजी गूळ खाणे उत्तम पर्याय आहे. यामुळे शरीराला झटपट ऊर्जा मिळते आणि वजन नियंत्रणात राहते. दररोज १० ते १५ ग्रॅम (लहान खडा) गूळ खाणे पुरेसे असते. डायबिटीस असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच गूळ खावा.

## पाककला

### मखाना-अक्रोड चिक्की

**साहित्य :** फुल मखाने २ वाटी, अक्रोड १ वाटी, गूळ १ वाटी, तूप २ चमचे, वेलची पावडर १/२ चमचा, तिळ २ चमचे, चिमूटभर मीठ

**कृती :** कढईत १ चमचा तूप घालून गरम करा. त्यात मखाने घालून मंद आचेवर ५-६ मिनिटे खरपूस भाजून घ्या. वेगळ्या प्लेटमध्ये काढून ठेवा. त्याच कढईत अक्रोडचे तुकडे घालून २ मिनिटे भाजा आणि मखान्यात मिसळा. तिळही १ मिनिट भाजून घ्या. एका कढईत उरलेले तूप घालून गूळ घाला. मंद आचेवर गूळ वितळू द्या. गुळाचा पाक थोडा घट्ट झाला की त्यात चिमूटभर मीठ आणि वेलची पावडर घाला. गुळाचा पाक चिकट झाला की त्यात भाजलेले मखाने, अक्रोड आणि तिळ घालून पटकन एकजीव करा. तूप लावलेल्या ताटाला हे मिश्रण पसरा. वरून लाटण्याने हलके दाबा. थोडे कोमट असतानाच सुरीने चौकोनी तुकडे पाडा. पूर्ण थंड झाल्यावर चिक्कीचे तुकडे वेगळे करा. हवाबंद डब्यात ठेवा.

## वास्तू

### आरसा कुठे असावा?

* घरातील सर्व आरसे किंवा ड्रेसिंग टेबल फक्त उत्तर किंवा पूर्व भिंतीवरच लावा. आरशात उत्तर किंवा पूर्व दिशेकडून येणारा प्रकाश परावर्तित झाला पाहिजे; मुख्य प्रवेशद्वाराच्या समोर आरसा लावू नका.

* आरसा अशा ठिकाणी ठेवा जिथे झोपलेल्या व्यक्तीचे प्रतिबिंब त्यात दिसणार नाही. जागा कमी असल्यास वापरून झाल्यावर आरशावर पडदा टाका.

* घरातील तिजोरी किंवा कॅश बॉक्सच्या समोर आरसा लावा, जेणेकरून त्यात पैशांचे प्रतिबिंब दिसेल.

* नेहमी चौकोनी किंवा आयताकृती आरसे वापरा. गोल, त्रिकोणी किंवा फुटलेले/ धुसर आरसे तात्काळ काढून टाका.

## सौंदर्य

* डोळ्यांखाली क्रीम किंवा तेल लावताना नेहमी अनामिका वापरा. या बोटाचा दाब सर्वात कमी असतो, ज्यामुळे नाजूक त्वचेला इजा होत नाही.

* वापरलेल्या ग्रीन टी बॅग्स फ्रीजमध्ये थंड करून १० मिनिटे डोळ्यांवर ठेवा. यातील कॅफिन आणि अँटीऑक्सिडंट्स डोळ्यांची सूज त्वरित कमी करतात.

## सल्ला

* तेल गरम झाल्यावर त्यात चिमूटभर मीठ टाका, यामुळे फोडणीचे शिंतोडे बाहेर उडत नाहीत आणि तेलही कमी शोषले जाते.

* किचन ओट्यावरील तेलकटपणा काढण्यासाठी नेहमी थंड पाण्याऐवजी गरम किंवा कोमट पाणी वापरावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, रोहिणी १६।५१, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. १० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आज कामात नवीन संधी मिळतील. रागावर नियंत्रण ठेवा आणि शांतपणे निर्णय घ्या.

**वृषभ :** कुटुंबासोबत चांगला वेळ जाईल. जुनी गुंतवणूक लाभ देऊ शकते.

**मिथुन :** आज बोलण्यात मधुरता ठेवा. विद्यार्थ्यांसाठी दिवस अनुकूल आहे.

**कर्क :** मन थोडे अस्वस्थ राहू शकते. खर्चावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

**सिंह :** आत्मविश्वास वाढेल. कामात वरिष्ठांची प्रशंसा मिळेल.

**कन्या :** कामाचा ताण जाणवेल पण शेवटी यश मिळेल. आरोग्याकडे लक्ष द्या.

**तूळ :** नातेसंबंधांमध्ये गोडवा येईल. भागीदारीच्या कामातून फायदा होईल.

**वृश्चिक :** धैर्याने घेतलेले निर्णय यशस्वी होतील. शत्रूंपासून सावध रहाल.

**धनु :** शिक्षण आणि अध्यात्माकडे ओढ वाढेल. प्रवासात लाभ होऊ शकतो.

**मकर :** घरातील वातावरण शांत राहिल.

**कुंभ :** मेहनतीचे फळ मिळेल. भावंडांकडून सहकार्य मिळेल.

**मीन :** सर्जनशीलता वाढेल. कला क्षेत्रातील लोकांसाठी दिवस चांगला आहे.

## शब्दगंध क्र. ७४९० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ■ | ५ | |
| ६ | | | ■ | | ■ | | ■ |
| ७ | | ■ | ८ | | ■ | ९ | १० |
| ■ | ११ | | | | ■ | ■ | |
| १२ | | ■ | | ■ | १३ | १४ | |
| | ■ | १५ | | | | | ■ |
| १६ | १७ | | | ■ | ■ | १८ | १९ |
| २० | | | ■ | २१ | | | |

**आडवे शब्द :-** १) तेलंगणा राज्याची राजधानी ५) हिस्सा; भाग ६) विष्णूचा पाचवा अवतार; बुटका माणूस ७) मोठी नदी ८) पायावर ताठ राहिलेला; न बसलेला ९) शक; साल; वर्ष ११) धनवान; श्रीमंत; सधन १२) शेतीतील विहिरीतून पाणी काढण्याचे पूर्वीच्या काळातील एक साधन १३) विष; गरळ १५) मनोरंजन १६) रत; लीन; गुंग; मग्न १८) एक विषारी साप २०) एका दिवसात आक्रमिलेला रस्ता; टप्पा २१) वाईट मनोवृत्तीचा

**उभे शब्द :-** १) पशू; जनावर २) नगाऱ्याचा वगैरे मोठा दुमदुम असा आवाज ३) वन; शेत; जंगल; वावर ४) सैन्य; फौज; सेना ५) पुन्हा; माघारी; परत ८) नमुना; मासला १०) मोठे गाव; शहर १२) मुस्लीम वर्षाचा पहिला महिना १३) जसे काय १४) अकारण किंवा सकारण; न्यायाने किंवा अन्यायाने १५) जास्तीतजास्त; अतिशयपणा; अफलातून काम १७) मला १९) विशिष्ट समूह; चमू; ब्लॉक

### शब्दगंध क्र. ७४८९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | धि | प्र | का | श | ■ | पा | र |
| प | ■ | का | स | व | ■ | र | मा |
| दा | द | र | ■ | ■ | सा | ख | र |
| ■ | ग | ■ | स | वा | ल | ■ | मी |
| ग | ड | ग | डा | ट | ■ | ख | ■ |
| ज | ■ | ळ | ■ | ■ | घा | त | क |
| ब | ■ | स | म | रा | स | ■ | ठी |
| ज | ब | र | द | स्त | ■ | बा | ण |

### फिल्मीचक्कर क्र. १२४८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्मि | ता | पा | टी | ल | ■ | दे | व |
| ता | ■ | स | ■ | क्ष्मी | ■ | ■ | सं |
| त | क | ■ | ■ | छा | या | गी | त |
| ळ | ■ | प | रा | या | ■ | त | ■ |
| व | जी | र | ■ | ■ | अं | गा | ई |
| ल | ■ | व | ■ | ■ | ग | या | ■ |
| क | ■ | री | मा | ■ | न | ■ | ख |
| र | मे | श | ■ | ह | की | क | त |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** अपयश म्हणजे मेहनत थांबवण्याचं कारण नाही, ते अजून जोमाने मेहनत करण्याचं निमित्त आहे.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## पक्षी आकाशात कसे उडतात? त्यांची रचना कशी असते?

निसर्गाची एक अद्भूत रचना आकाशात मुक्तपणे विहार करणारे पक्षी आणि त्यांची उडण्याची अद्भूत क्षमता ही निसर्गाची एक अनोखी रचना आहे. मानवाने जेव्हा पहिल्यांदा विमानाचा शोध लावला, तेव्हा त्याने पक्ष्यांच्या शरीराची रचना पाहूनच प्रेरणा घेतली होती. पक्षी हवेत इतक्या सहजतेने कसे उडू शकतात, यामागे काही प्रमुख वैज्ञानिक आणि शारीरिक कारणे आहेत.

पक्ष्यांचे शरीर पुढून आणि मागून निमुळते तर मध्यभागी फुगीर असते. या विशिष्ट आकारामुळे जेव्हा पक्षी हवेत पुढे जातात, तेव्हा हवा त्यांच्या शरीराला अडथळा न निर्माण करता सहज बाजूला सरकते. विमानाचा पुढचा भाग जसा अणकुचीदार असतो, तशीच रचना निसर्गाने पक्ष्यांची केली आहे. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची पोकळ आणि हलकी हाडे. मानवी किंवा इतर प्राण्यांची हाडे ही आतून घट्ट आणि जड असतात. याउलट, पक्ष्यांच्या हाडांमध्ये आतून पोकळ्या म्हणजेच हवेच्या पिशव्या असतात. यामुळे त्यांची हाडे अत्यंत मजबूत असूनही वजनाने अतिशय हलकी असतात. वजन कमी असल्यामुळे त्यांना गुरुत्वाकर्षणाच्या विरोधात हवेत राहणे सोपे जाते.

तिसरे आणि मुख्य साधन म्हणजे पंखांची रचना आणि पिसे. पक्ष्यांचे पंख हे केवळ उडण्यासाठीच नाही, तर हवेचा दाब नियंत्रित करण्यासाठी असतात. पंखांचा वरचा भाग थोडा वक्र असतो. जेव्हा पक्षी पंख हलवतात, तेव्हा पंखांच्या वरच्या बाजूने हवा वेगाने वाहते आणि खालच्या बाजूने हळू वाहते. यामुळे पंखांच्या खाली हवेचा एक उच्च दाब तयार होतो, जो पक्ष्याला आपोआप वर ढकलतो. याशिवाय, पक्ष्यांच्या छातीचे स्नायू इतर प्राण्यांच्या तुलनेत अत्यंत शक्तिशाली असतात. हे स्नायू पंखांना सतत वर-खाली करण्यासाठी लागणारी प्रचंड ऊर्जा देतात. उडताना दिशा बदलण्यासाठी आणि वेग नियंत्रित करण्यासाठी पक्षी आपल्या शेपटीचा वापर ब्रेक किंवा सुकाणूसारखा करतात.

थोडक्यात सांगायचे तर, अतिशय हलके शरीर, हवेला कापणारा विशिष्ट आकार, शक्तिशाली स्नायू आणि विज्ञानाच्या नियमांचा वापर करणारी पंखांची रचना या सगळ्यांच्या मिलाफामुळेच पक्षी आकाशात अतिशय सहज आणि न थकता उडू शकतात.

## 'बोलणारे झाड'

बोलणारे झाड आणि लोभी लाकूडतोड्या एका सुंदर आणि घनदाट जंगलाच्या वेशीवर रामू नावाचा एक लाकूडतोड्या राहत होता. तो रोज जंगलात जाऊन वाळलेली लाकडे तोडायचा आणि शहरात विकून आपला संसार चालवायचा.

एक दिवस लाकडे शोधत तो जंगलाच्या खूप आत गेला. तिथे त्याला एक भलंमोठं, हिरवेगार आणि दाट सावली असलेले वडाचे झाड दिसले. त्या झाडाची लाकडे विकली तर खूप पैसे मिळतील, या विचाराने रामूने आपली कुऱ्हाड वर उचलली. जशी कुऱ्हाड झाडावर पडणार, तसा एक शांत आणि मऊ आवाज आला, थांब, रामू! मला तोडू नकोस. रामू घाबरून मागे सरकला. त्याने इकडेतिकडे पाहिले, पण तिथे कोणीच नव्हते. झाड पुन्हा बोले, मी या जंगलातील सर्वात जुने झाड आहे. माझ्या फांद्यांवर शेकडो पक्षी राहतात, माझ्या सावलीत वाटसरू विश्रांती घेतात आणि मी तुम्हा सर्वांना स्वच्छ हवा देतो. जर तू मला सोडलेस, तर मी तुला रोज सुकलेल्या फांद्या आणि गोड फळे देईन.

रामूने झाडाचे म्हणणे मानले. रोज तो त्या झाडाकडे जायचा. झाड स्वतःहून आपल्या वाळलेल्या फांद्या खाली पाडायचे आणि रामूला गोड फळेही द्यायचे. यामुळे रामूचे काम सोपे झाले आणि त्याला चांगले पैसेही मिळू लागले. पण हळूहळू रामूच्या मनात लोभ वाढू लागला. तो विचार करू लागला, झाड मला रोज थोडीच लाकडे देते. जर मी हे संपूर्ण झाडच एकदाच तोडले, तर मला एकदम खूप लाकडे मिळतील. ते विकून मी खूप श्रीमंत होईन आणि मला रोज जंगलात यावेही लागणार नाही!

दुसऱ्या दिवशी रामू मोठी कुऱ्हाड घेऊन झाडाजवळ पोहोचला. झाडाने त्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला, रामू, लोभ करू नकोस. मला तोडलेस तर पक्षी बेघर होतील आणि या भागातील सावली व हवा नष्ट होईल. पण लोभाने आंधळ्या झालेल्या रामूने झाडाचे एकही ऐकले नाही आणि कुऱ्हाडीचा मोठा वार झाडाच्या खोडावर केला.

झाड खाली कोसळले. पण झाड पडताना त्याची एक भलीमोठी जड फांदी रामूच्या दोन्ही पायांवर पडली. रामू जोरात ओरडला, पण त्याला वाचवायला तिथे कोणीच नव्हते. तो मदतीसाठी तासन्तास तडफडत राहिला. झाड तर नष्ट झालेच होते, ज्यामुळे रामूला फळे आणि सुकी लाकडे मिळणे कायमचे बंद झाले. तसेच पायाला गंभीर दुखापत झाल्यामुळे तो आयुष्यभरासाठी अपंग झाला. स्वतःच्या लोभामुळे त्याने आपली उपजीविका आणि आरोग्य दोन्ही गमावले.

तात्पर्य - निसर्ग माणसाची गरज भागवू शकतो, पण त्याचा लोभ कधीच भागवू शकत नाही. स्वतःच्या तात्पुरत्या फायद्यासाठी निसर्गाचा विनाश केला, तर त्याचा वाईट परिणाम शेवटी माणसालाच भोगावा लागतो.

# आत्मशक्ति



## सेवेतच ईश्वर

ह्या कारणांचा विचार न करता लोक दुसऱ्यांच्या चालीरिती, रूढी व धार्मिक वर्तणूकीकडे घृणा व भेदभावाच्या दृष्टीने पाहतात. मतभेदाचे आणखी एक कारण 'भाषा' हे होय! जेव्हा विभिन्न धर्मातील लोक विशिष्ट बाब सम जण्यासाठी वेगवेगळ्या शब्दांचा वापर करतात तेव्हा धर्माधर्मातील फरक ध्यानात घेऊन आपल्या धर्माला दुसऱ्या धर्माहून श्रेष्ठ समजू लागतात. प्रत्येक धम तून परमेश्वराला वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. त्याला मुसलमान 'अल्ला', शीख लोक 'वाहेगुरु', हिंदु 'परमात्मा किंवा परमेश्वर' आणि ख्रिश्चन आणि यहूदी 'लॉर्ड किंवा गॉड' असे म्हणतात. हे सर्व शब्द तर परमेश्वरासाठीच आहेत. मग ते कोणत्याही धर्मातील असो! तरी सुद्धा भाषाभाषांतील फरकाने ते नावडीचे कारण होऊन वादविवाद सुरु होतात. आम्ही म त्र सोईस्करपणे विसरतो की भाषा बनण्यापूर्वीही परमेश्वराचे अस्तित्व होते. आम्ही चारी दिशांनी ह्या भेदाच्या भिंती उभ्या करून स्वतःला त्यात कोंडून घेऊन मर्यादा घालून घेतो. पण आमचा आत्मा तर अमर्यादित आहे. जगाने बनविलेल्या ह्या भिंतीच्या मागे सर्वांना समान जोडणारी आत्मशक्ती अस्तित्वात आहे. संत महात्म्यांनी आम्हाला खरी वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे की आम्ही सर्व परमेश्वराचे अंश आहोत. आम्ही प्रभूप्रेमाने परिपूर्ण भरलेले असे चैतन्यशाली आत्मे आहोत. जे काही मतभेद आहेत ते तर म नवाने बनविले आहेत. आमचा आत्मा, परमेश्वराचेच रूप आहे. आमचे खरे स्वरूप समजण्यासाठी आम्ही उभे केलेले अडथळे, बनविलेल्या काल्पनिक भिंती दूर करावयास हव्यात! कारण त्यांच्यामुळेचहोईल की आम्ही सर्वजण एकमेकांचे दूरचे बहीणभाऊ आहोत. तेव्हा ह्यांत परके कोण? कोणीही नाही. आम्ही सर्वजण एकाच सृष्टी कुटुंबातील बहीणभाऊ आहोत. आम्ही जर ह्या नात्याने विचार केला व तसे वागलो तर बाह्य फरकांमुळे निर्माण झालेले मतभेद शिल्लकच राहणार नाहीत. लोकांशी जोडले गेल्याने अत्यंत आनंद मिळतो. लोकांत अत्यंतिक प्रेमाने मिसळले, अनोळखी सारखे दूर राहिलेच नाही तर आमचा संपूर्ण दिवस आनंदात जाईल. क्षणभर थांबून आपल्या सहकाऱ्यांबरोबर, पोस्टमन, दुकानदार, बस

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

## शुद्ध विचार

शिवानीदीदी : ह्या सगळ्यामागे महत्वाचा विचार काय असतो? आपण असा विचार करतो की, जर आपण बाळाच्या जन्माची तारीख आणि वेळ ठरवू शकलो तर त्या बाळाचं नशीब ठरवू शकतो. आता आपल्याला हे समजलं आहे की, विचारांमधून भावना निर्माण होतात, त्यातून आपली वृत्ती, आपलं व्यक्तिमत्व आणि आपलं नशीब आकाराला येतं. त्यामुळे बाळाचं नशीब त्याच्या विचारांवर अवलंबून आहे आणि म्हणून सुरुवातीपासून आपण त्याकडे लक्ष द्यायला हवं.

सुरेश ओबेरॉय : जसे आईचे विचार असतील तसेच बाळाचेहि.

शिवानीदी : हो. आतापर्यंत आपण याबद्दल आध्यात्मिक अंगाने चर्चा करत होतो. जशा आईच्या भावना तशाच बाळाच्या भावना. ह्यावर अलीकडच्या शास्त्रीय अभ्यासातूनही शिक्कामोर्तब झाले आहे. याचा अर्थ, आई तिच्या भावनांची फोटोकॉपी निर्माण करत असते.

सुरेश ओबेरॉय : आमच्याकडे घरी दोन नातवंडं आहेत. डॉक्टर म्हणतात की मी त्यांच्यावर उपचार करणार नाही कारण मुलं त्यांच्या आई-वडिलांमुळे आजारी असतात.

शिवानीदीदी : बरोबर. मेडिकल सायन्स जे सांगतं तेच डॉक्टर सांगत आहेत. जर बाळाला त्रास होत असेल तर पालकांनी स्वतःकडे लक्ष द्यायला पाहिजे आणि ही काळजी बाळ आईच्या उदरात असेल त्या क्षणापासून घ्यावी लागेल.बाळाचं नशीब आणि तब्येत बहुतांश प्रमाणात पालकांच्या हातात असते. बाळाच्या भल्यासाठी ते आयुष्यभर प्रयत्न करतात. त्यांनी त्यांचे विचार आणि जीवनपद्धती बदलण्यासाठी आजच कामाला सुरुवात करायला हवी.अनेक लोक दिवसाची सुरुवात वृत्तपत्र वाचनाने करतात. बाळ त्याच्या आई-वडिलांच्या मनात निर्माण होणारे विचार ग्रहण करतं. त्यामुळे सकाळी-सकाळी अहिंसा, दुःख, दहशतवाद यांबाबत जाणून घेणं पालकांना परवडणार नाही. जीवनपद्धतीतील हे बदल फक्त आईनेच नाही तर त्या जोडप्याने आत्मसात करायला हवेत. त्यांनी त्यांच्या दिवसाची सुरुवात एकत्रितपणे एखाद्या शुद्ध आणि शक्तिशाली वाचनाने करायला हवी. खरं म्हणजे त्यांनी त्यांच्या दिवसाची सुरुवात ध्यानाने करायला हवी. दिवसभर ते शांत, संयमी आणि सहज राहतील असं ठरवायला हवं. याचं कारण त्यांचे विचार त्यांच्या बाळाचे विचार निर्माण करणार असतात. दररोज सकाळी जर पालकांनी अशी कल्पना केली की, त्यांना परम ात्म्याकडून शक्ती मिळत आहे आणि ती शक्ती ते त्यांच्या बाळाकडे पाठवत आहेत, तर ते शुद्ध ऊर्जेसह त्यांच्या बाळाचं संरक्षण करायला सुरुवात करतील.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**गंपू :** वजन पटकन कमी करायला काय करू?

**झंपू :** मान उजवीकडे आणि डावीकडे फिरवत जा...

**गंपू :** कधी? **झंपू :** जेव्हा कुणी जेवायला किंवा खायला विचारेल तेव्हा!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताचे सध्याचे सरन्यायाधीश कोण आहेत?

- न्यायमूर्ती संजीव खन्ना (नोव्हेंबर २०२४ पासून पदभार)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## गहू

९) गव्हाच्या पिठापासून पोळी, पुरणपोळी, पुरी, केक, बिस्किटे, ब्रेड, पाव, शिरा, शेवया, पराठा असे अनेक खाद्यपदार्थ बनविता येतात. हे सर्व पदार्थ आरोग्याच्या दृष्टीने पौष्टिक असतात. फक्त हे पदार्थ सहसा घरी बनविलेले खावेत. पदार्थ तयार करताना गव्हाचे पीठ चाळून न घेता कोंड्यासह वापरावे.

गव्हांकुर बनविण्याची पद्धत :गहू आठ ते दहा तास भिजत घालून त्यातील पाणी काढून टाकावे व सात कुंड्या घेऊन त्यात माती टाकून रोज एका कुंडीत गहू पेरावे. असे सलग सात दिवस करावे. आठव्या दिवशी पहिल्या कुंडीत उगवलेले गव्हांकुर स्वच्छ धुऊन त्याचा रस काढून प्यावा. रस करताना त्यात थोडे पाणी घालावे. हा रस बनविल्यानंतर लगेचच प्यावा.

साधारणतः हा रस १० ते १५० मि.लि. इतक्या प्रमाणात आठवडाभर प्यावा. शक्यतो रस जेवणापूर्वी तासभर व जेवणानंतर दोन ते तीन तासांनी प्यावा व पिताना त्याचे घोट हे हळूहळू गिळावे. एकदम घाईघाईने पिऊ नये.

सावधानता :गव्हाचा मैदा हा पचण्यास जड, निःसत्व व चिकट असतो. म्हणून आहारात मैद्याचा वापर करू नये. त्याऐवजी कोंड्यासह गव्हाच्या पिठाचा वापर करावा.

## ज्वारी

सर्वसामान्य वर्गापासून ते अगदी उच्च वर्गापर्यंत आहारातील मुख्य घटक म्हणून ज्वारीचा उपयोग केला जातो. भारतामध्ये ग्रामीण भागात ज्वारी हीच मुख्य दैनंदिन आहार म्हणून वापरली जाते. मराठीमध्ये 'ज्वारी', संस्कृतमध्ये 'यवनाल', इंग्रजीमध्ये 'यलो मिलेट', तर शास्त्रीय भाषेत 'सॉरगम' या नावाने ओळखली जाणारी ज्वारी हे धान्य 'पोएसी' कुळातील आहे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# किशोर कुमार यांच्या जयंतीनिमित्त 'गीतमैफल' हाऊसफुल

## किशोर कुमार सन्मित्र पुरस्कार डॉ. अभिजीत पाठक व सूत्रसंचालक प्रसाद बेडेकर यांना प्रदान




आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते किशोर कुमार सन्मित्र पुरस्कार डॉ. अभिजीत पाठक यांना प्रदान करण्यात आला. किशोर कुमार यांची गीते सादर करताना गायक अजय दगडे आणि गायिका राधिका अत्रे.

नगर – सदाबहार गायक स्वर्गीय किशोर कुमार यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त किशोर कुमार फॅन क्लब, पोलाद स्टील आणि विंटेज हिल्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली प्यार दिवाना होता है ही गीतमैफल रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात हाऊसफुल झाली. माऊली संकुल येथे आयोजित या कार्यक्रमाला नगरकरांनी मोठी गर्दी केली होती. जुन्या हिंदी चित्रपटसंगीताची सुवर्णपाने उलगडणाऱ्या या मैफलीत गायक इंजिनिअर अजय दगडे आणि पुण्यातील प्रसिद्ध गायिका राधिका अत्रे यांच्या सुरेल सादरीकरणाने श्रोते मंत्रमुग्ध झाले. प्रत्येक गाण्यानंतर सभागृहात वन्स मोअर वन्स मोअर अशा घोषणांचा जल्लोष घुमत होता.

याच कार्यक्रमात यंदाचा किशोर कुमार सन्मित्र पुरस्कार सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजीत पाठक तसेच सूत्रसंचालक प्रसाद बेडेकर यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, पोलाद स्टीलचे अध्यक्ष जयेश मेहता, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे सुमित कोल्हे, डॉ. बापूसाहेब कांडेकर, एसाचे अध्यक्ष अभिजीत देवी, सुप्रसिद्ध चित्रकार प्रमोद कांबळे, आशिष पोखरणा, मयूर कोठारी, डॉ. हर्षवर्धन तनवर, अमोल खोले, किरण गवते, क्षितिज झावरे, प्रल्हाद जोशी, डॉ. रेणुका पाठक, डॉ. मुग्धा तनवर, अमित गटणे, करण भळगट, अभिषेक शेलार यांच्यासह फॅन क्लबचे सदस्य व रसिक उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, अहिल्यानगर शहराचा कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा अशा दर्जेदार कार्यक्रमांच्या माध्यमातून जपला जात आहे. स्वर्गीय किशोर कुमार यांचा आवाज आजही प्रत्येक पिढीला तितकाच भावतो. व्यक्तीची खरी ओळख तिच्या विचारांतून आणि कर्तृत्वातून निर्माण होत असते. किशोर कुमार यांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून लाखो रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले असून त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या स्वरांची जादू कायम आहे. किशोर कुमार फॅन क्लबचे गायक इंजिनिअर अजय दगडे यांनी गेल्या १९ वर्षांपासून ही परंपरा अखंडपणे जिवंत ठेवली असून नगरकरांनीही त्यांना भरभरून प्रतिसाद दिला आहे. शहराच्या विकासाबरोबरच आपल्याला लाभलेला सांस्कृतिक वारसाही जपण्याची जबाबदारी सर्वांची असल्याचे त्यांनी सांगितले.

किशोर कुमार सन्मित्र पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. अभिजीत पाठक म्हणाले, स्वर्गीय किशोर कुमार यांनी आपल्या आवाजातून माणसांच्या मनावर कायमस्वरूपी अधिराज्य गाजवले. त्यांच्या निधनाची बातमी मी आणि माझ्या बहिणीने दूरदर्शनवर पाहिली होती. त्यावेळी तिच्या डोळ्यांतील अश्रूंमधून त्यांच्याविषयी असलेले प्रेम आणि भावनिक नाते जाणवले. त्यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार स्वीकारणे ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. यावेळी त्यांनी कोरा कागज था ये मन मेरा हे लोकप्रिय गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात गायक इंजिनिअर अजय दगडे आणि गायिका राधिका अत्रे यांनी किशोर कुमार यांच्या अजरामर गीतांना आपल्या सुरेल आवाजात ३० सदाबहार गीते सादर करत सभागृह जिंकून घेतले. प्रत्येक गीताला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. अनेक गाण्यांना श्रोत्यांनी उभे राहून प्रतिसाद दिला, तर वन्स मोअरच्या घोषणांनी संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले.

कार्यक्रमाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे सुप्रसिद्ध चित्रकार प्रमोद कांबळे यांनी रंगमंचावर उपस्थितांसमोर स्वर्गीय किशोर कुमार यांचे हुबेहूब लाईव्ह पेन्सिल चित्र रेखाटले. अवघ्या काही मिनिटांत साकारलेले जिवंत भासणारे चित्र पाहून उपस्थित रसिक भारावून गेले. त्यांच्या अप्रतिम चित्रकलेला टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून दाद मिळाली. चित्रकलेच्या माध्यमातून त्यांनी किशोर कुमार यांना अनोखी मानवंदना अर्पण केली. संगीत, चित्रकला आणि सांस्कृतिक वारशाचा सुंदर संगम अनुभवताना नगरकरांनी जुन्या सदाबहार गीतांचा मनमुराद आनंद लुटला. प्रास्ताविक अमोल खोले यांनी केले.

सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. किरण गवते यांनी आभार मानले.

सुमित कोल्हे म्हणाले, कोपरगावहून अहिल्यानगरला येताना मनमाड महामार्गाच्या दुरवस्थेमुळे मोठा त्रास सहन करावा लागतो. मात्र स्वर्गीय किशोर कुमार यांच्या गीतांचा आनंद घेण्यासाठी हा प्रवासही सुखद वाटला. या निमित्ताने त्यांनी मनमाड महामार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## बापुडा मी नव्हे



संकलन: दिशान फिचर्स

डॉ. मधुकर आष्टीकर लिखीत नंदादीप ग्रंथिका ९८९०९५६६९५

मी महान. कारण माझे नामवंत खानदान। आज पणजे वडील सतत करायचे दान। त्यांचा सरकारात तरी केवढा असे मान। पण माणसा, तुझे स्वत:चे काय योगदान? ठाऊक नाही का तुला हे सुभाषित?

तोच पुरुषोत्तम म्हणावा, जो आपल्या बळावर जगावा. आत्मतेजानं मोठा व्हावा. त्याच्या कर्तृत्वाचा ठसा लोकात उमटावा. वाडवडिलांच्या नावावर का मी मोठेपण मिरवायचे? ते तर कमीपणाचे। तसे आईच्या कुळाची कीर्ती गायची आणि स्वत:ची तुंबडी भरायची? ही तर परिसीमाच अधोगतीची। आणि सासऱ्याच्या नावावर मारायच्या उड्या? म्हणजे शर्यतीत धावायचे घेऊन कुबड्या। काय पडणार पदरात? संत तुकाराम स्वत:च्या भक्तीच्या बळावर ताठ उभे झाले। आणि गरजले.

कुळाचा नावलौकिक नाही पाठीशी. माझ्यात जातीला तरी किंमत कुठे फारशी? तरी मी नाही दीनवाणा। नको करायला कीव माझी. नाही मी दुबळा. नाही ठेंगणा दबून जाणार. कारण मी उभा पुण्याईवर माझ्या। सुखाच्या राशी मी माझ्या बळावर केल्या उभ्या। हे आहेत तुकोबांच्या आत्मप्रतीतीचे बोल. त्यालाच जगात आहे मोल.

जैन आगमातील एक कहाणी आहे. एक सिंहाचा छावा आई वडिलांच्याच जिवावर जगायचा. एकदा तो झाला एकाएकी पोरका। पोट भरायला निघाला. आई वडील म्हणायचे, जंगलात वानरं असतात झाडावर बसलेली. आपण तिकडे जावून डरकाळी फोडायची। पटकन घाबरून पडतात वानरं झाडावरची. मग आपण शिकार करायची.

एक वानर होते. वाडवडिलांचे असे मरण त्याने पाहिले होते. आपणी का मरायचे तसे? छे वाडवडिलांचा मार्ग सोडून आपण आपली बुद्धी व कर्तृत्व वापरायचे। एकदा तो सिंह आला झाडाकडे फोडली त्यानं डरकाळी. झाडाखाली दिसली वानराची सावली काळी. वर ते वानर असतात झाडावर बसलेली. आपण तिकडे जावून डरकाळी फोडायची. पटकन घाबरून पडतात वानरं झाडावरची। मग आपण शिकार करायची।

एक वानर होते. वाडवडिलांचे असे मरण त्याने पाहिले होते. आपणी का मरायचे तसे? छे वाडवडिलांचा मार्ग सोडून आपण आपली बुद्धी व कर्तृत्व वापरायचे। एकट तो सिंह आला झाडाकडे. फोडली त्यानं डरकाळी. झाडाखाली दिसली वानराची सावली काळी. वर ते वानर बसलेच होते. उन्हाच्याविरुद्ध दिशेने जमिनीवर पूर्ण आकाराची सावली पडेल असे सिंहाला वडिलांचे वचन आठवले. आपण डरकाळी फोडताच वानर खाली पडले. तो सिंह त्या वानराच्या पूर्णाकृती सावलीलाच वानर समजला. जोरजोराने पंचे मारू लागला. तो सावली दगडावर पडली होती. तो दगड त्याने जबड्याने चावला। सिंहाची नखे रक्तबंबाळ झाली. दाढा दुखावल्या. तो पीडा सहन न होऊन त्याने तिथून धूम ठोकली. वानराची स्वारी टाळ्या पिटू लागली. स्वळावर उभा झाला। तोच जगी महान ठरला।।

– **किशोर गांधी**

# वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी अहिल्यानगरचे अ‍ॅड.राजेंद्र पातोडे यांची निवड



नगर – लोकशाहीची मूल्ये जिवंत ठेवण्यासाठी आणि पक्षाची संघटनात्मक चौकट अधिक बळकट करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या अंतर्गत निवडणुका पूर्णपणे बॅलेट पेपरवर पारदर्शक वातावरणात पार पडल्या. या निवडणुकीचा निकाल अधिकृतपणे जाहीर झाला असून पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी अ‍ॅड. राजेंद्र पातोडे यांची निवड झाली आहे.

या सर्व नवनिर्वाचित उमेदवारांचे अभिनंदन करत वंचित बहुजन आघाडी अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

पक्षाचे सर्वोच्च नेते अ‍ॅड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत केंद्रीय निवडणूक अध्यक्ष अ‍ॅड. प्रियदर्शी खुशाल तेलंग हे प्रमुख उपस्थित होते. ही सर्व मतदान मोजणी प्रक्रिया राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते, सर्व उमेदवारांचे प्रतिनिधी, अनेक पदाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी अत्यंत अत्यंत नियोजनबद्ध व व्यवस्थितपणे हाताळून पार पाडली. या निवडणुकीद्वारे घोषित करण्यात आलेल्या १२ सदस्यीय राज्य कार्यकारिणीत सुजात आंबेडकर, डॉ. अरुण जाधव, इंजि. प्रशांत इंगोले, जितरत्न पटाईत, डॉ. चित्रा कुऱ्हे, दीपक डोके, नागोराव पांचाळ, सर्वजित बनसोडे, कृष्णा देशमुख, सारंग थोरात, ज्ञानेश्वर कवठेकर आणि उत्तम वनशिव यांची निवड झाली आहे.

पक्षाच्या सर्व सभासदांच्या प्रत्यक्ष कौलातून हे नेतृत्व पुढे आले असून, नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष व कार्यकारिणी सदस्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष आगामी काळात अधिक सक्षमतेने कार्य करेल, असा विश्वास व्यक्त करत जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी सर्व विजयी उमेदवारांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नगरच्या दिल्ली गेटवरून 'राष्ट्रीय धारणालय क्रांती'ची घोषणा

## ८ ऑगस्टला जातिव्यवस्था, अंधश्रद्धा व मतदास्याविरोधात एल्गार

नगर – जातिव्यवस्था, स्त्रीदास्य, मतदास्य, अंधश्रद्धा, दैववाद, व्यक्तिपूजा आणि स्वार्थी सत्तालालसा या भारताच्या समताधिष्ठित, विज्ञाननिष्ठ आणि संविधाननिष्ठ राष्ट्रीय धारणालयाच्या शत्रू प्रवृत्ती आहेत. या मानसिक गुलामगिरीविरुद्ध ८ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगरच्या ऐतिहासिक दिल्ली गेटवरून 'राष्ट्रीय धारणालय क्रांती'ची घोषणा करण्यात येणार आहे. पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने 'जंतर-मंतर क्रांती दिना'निमित्त या लोकशिक्षण चळवळीचा प्रारंभ होणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.

व्यक्तीच्या मेंदूत आयुष्यभर साठणारे ज्ञान, अनुभव, संस्कार, श्रद्धा, भीती आणि पूर्वग्रह यांचे बिगर-आनुवंशिक माहितीभांडार म्हणजे धारणालय. हेच व्यक्तीच्या वर्तनाची अंतर्गत राज्यघटना म्हणून काम करते. धारणालयात जातीयता, स्त्रीविरोध, मतदास्य आणि अंधश्रद्धा रुजल्यास सामाजिक विषमता आणि मानसिक गुलामगिरी टिकून राहते. मात्र संघर्ष माणसाविरुद्ध नसून, त्याच्या धारणालयातील अन्यायकारी आणि कालबाह्य प्रवृत्तींविरुद्ध आहे. माणूस शत्रू नाही; जातिव्यवस्था, स्त्रीदास्य, मतदास्य, अंधश्रद्धा आणि दैववाद या राष्ट्रीय धारणालयाच्या शत्रू प्रवृत्ती आहेत, हा या क्रांतीचा मुख्य संदेश असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

न्यूरोप्लास्टिसिटीमुळे मेंदूच्या सवयी, शिकण्याच्या पद्धती आणि विचार जाळे बदलता येतात. त्यामुळे जुने धारणालय हे प्रारब्ध नसून, ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, आत्मपरीक्षण आणि विवेकाच्या साहाय्याने त्याची पुनर्घटना करता येते. ही क्षमता मानवाला मिळालेले निसर्गाचे वैज्ञानिक पसायदान असल्याचे म्हंटले आहे.

या चळवळीत राष्ट्रीय तिरंगा हाच राष्ट्रीय धारणालयाचे प्रतीक म्हणून मांडला जाणार आहे. केशरी रंग लोकभक्तीचा, पांढरा ज्ञानभक्तीचा, हिरवा कर्मभक्तीचा; तर अशोकचक्र संविधानिक नैतिकता, कायद्याचे राज्य आणि गतिशील लोकशाहीचे प्रतीक असेल. लोकभक्तीविना सत्ता स्वार्थी, ज्ञानभक्तीविना सत्ता आंधळी, कर्मभक्तीविना सत्ता निष्प्रभ आणि संविधानिक नैतिकतेविना लोकशाही दिशाहीन होते. म्हणून तिरंगा केवळ हातात नव्हे, तर प्रत्येक नागरिकाच्या धारणालयात रुजला पाहिजे, अशी भावना अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केली आहे.

या चळवळीसाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, अ‍ॅड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, अ‍ॅड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, अड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी यांच्यासह अनेक कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

# कुकडी व घोड प्रकल्पातील प्रलंबित कामांचा पालकमंत्र्यांकडून आढावा

## कालवा दुरुस्तीसाठी निधी कमी पडू देणार नसल्याची दिली ग्वाही




श्रीगोंदा येथे आयोजित कुकडी व घोड प्रकल्पातील प्रलंबित कामांच्या आढावा बैठकीत बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील.

नगर – राज्याला दुष्काळमुक्त करण्याच्या उद्देशाने जलसंपदा प्रकल्पांची कामे वेगाने पूर्ण करण्यावर शासनाचा भर असून, शेतकऱ्यांना सिंचनासाठी पूर्ण क्षमतेने पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

श्रीगोंदा येथे आयोजित बैठकीत त्यांनी कुकडी व घोड प्रकल्पातील प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी जलसंपदा विभागाची कामे वेळेत पूर्ण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पहिल्या टप्प्यात दोन वर्षांत पूर्ण होऊ शकणाऱ्या कामांना प्राधान्य देण्यात येत असून, त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे.

पालकमंत्री म्हणाले की, श्रीगोंदा तालुक्यातील पाच महत्त्वाच्या विकासकामांच्या निविदा पूर्ण झाल्या असून, या माध्यमातून तब्बल १३२ कोटी रुपयांची विकासकामे हाती घेतली जात आहेत. कालव्यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. सिंचन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी वेळेत आणि पूर्ण क्षमतेने मिळणे हेच शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत त्यांनी विविध कामांबाबत अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. सरस्वती नदीतील गाळ काढणे, नदीचे रुंदीकरण तसेच सुशोभीकरणासाठी तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच विसापूर व कुकडी कालव्याची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, पाणी वापर संस्थांची बैठक आयोजित करून शेतकऱ्यांशी समन्वय वाढवावा आणि अधिकाऱ्यांनी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून त्या तातडीने सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार विक्रम पाचपुते यांनी सांगितले की, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय राहिल्यास शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न वेगाने मार्गी लागू शकतात. पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत सिंचनाशी संबंधित अनेक प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले असून, त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बैठकीपूर्वी त्यांनी रुईगव्हाण येथील कुकडी डावा कालवा भोसे खिंड शीर्ष विमोचक तसेच बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची देखील त्यांनी पाहणी केली.

यावेळी माजी मंत्री बबनराव पाचपुते, अधीक्षक अभियंता अलका अहिरराव, उपविभागीय अधिकारी श्री. चिंचकर, सुनीता खेतमाळीस, तहसीलदार, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत कुकडी व घोड प्रकल्पांशी संबंधित विविध विकासकामे, कालव्यांच्या दुरुस्त्या, सिंचन व्यवस्थेची कार्यक्षमता आणि शेतकऱ्यांच्या समस्या यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी आरोपी चिरंजीव गाढवेचा जामीन रद्द

नगर – युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्यावरील प्राणघातक हल्ला प्रकरणातील मुख्य आरोपी चिरंजीव गाढवे यांचा अटकपूर्व जामीन जिल्हा न्यायालयाने रद्द केला असून, त्यांना दि. ६ ऑगस्ट रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात शरण येण्याचे आदेश दिले आहेत. जामीन मंजूर करताना घालण्यात आलेल्या अटींचा भंग केल्याबरोबरच जामिनाचा गैरवापर केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाल्याने न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

२७ डिसेंबर २०२५ रोजी एमआयडीसी परिसरात युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. या हल्ल्यात मुख्य आरोपी चिरंजीव गाढवे याने बंदुकीचा वापर केल्याचा, तर इतर आरोपींनी कोयत्यासारख्या धारदार शस्त्रांचा वापर केल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेप्रकरणी योगेश गलांडे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी चिरंजीव गाढवे यांनी जिल्हा न्यायालयात क्रिमिनल अँटिसिपेटरी बेल अर्ज क्रमांक ६४/२०२६ दाखल केला होता. न्यायालयाने ५ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांना अटींसह अटकपूर्व जामीन मंजूर केला. जामिनाच्या आदेशात आरोपीने दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत प्रत्येक रविवारी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजेरी लावणे, तसेच भविष्यात अशा प्रकारचा कोणताही गुन्हा न करणे, अशा स्पष्ट अटी घालण्यात आल्या होत्या. मात्र, आरोपीने न्यायालयाच्या आदेशातील अटींचे पालन केले नसल्याचे तपासादरम्यान समोर आले. नियमित हजेरी न लावल्याने तपासी अधिकाऱ्यांनी सरकारी वकिलांमार्फत क्रिमिनल एम.ए. क्रमांक ५८/२०२६ अन्वये जामीन रद्द करण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला. जामीन रद्द करण्याच्या अर्जावर ३ ऑगस्ट रोजी जिल्हा न्यायालय क्रमांक ६ समोर सविस्तर युक्तिवाद झाला. सरकार पक्षाने आरोपीने जामिनाच्या अटींचा भंग केला असून, जामिनाचा स्पष्टपणे गैरवापर केल्यामुळे त्याचा अटकपूर्व जामीन रद्द करण्यात यावा, अशी भूमिका मांडली. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत चिरंजीव गाढवे यांचा अटकपूर्व जामीन रद्द केला आणि ६ ऑगस्ट रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात शरण येण्याचे आदेश दिले. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे गोरक्षनाथ मुसळे यांनी काम पाहिले, तर मूळ फिर्यादी योगेश गलांडे यांच्या वतीने अ‍ॅड. सागर वाव्हळ यांनी बाजू मांडली.



विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी घेतली अण्णा हजारे यांची भेट घेवून प्रकृतीची विचारपूस केली.

# सभापती प्रा.राम शिंदे यांनी घेतली अण्णा हजारे यांची भेट

नगर – राज्याचे विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी ज्येष्ठ समाजसेवक, पद्मभूषण अण्णा हजारे यांची राळेगणसिद्धी येथे भेट घेत प्रकृतीची विचारपूस केली. अण्णा हजारे यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशा सदिच्छाही त्यांनी व्यक्त केल्या.

गेल्या तीन दिवसांपूर्वी अण्णा हजारे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आवश्यक वैद्यकीय उपचारानंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने ते राळेगणसिद्धी येथे परतले. त्यांच्या प्रकृतीची माहिती घेण्यासाठी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी प्रा. शिंदे यांनी अण्णा हजारे यांच्याशी संवाद साधत त्यांच्या आरोग्याची सविस्तर माहिती घेतली. तसेच त्यांनी उपस्थित सहकाऱ्यांशीही चर्चा करून उपचारांबाबत माहिती जाणून घेतली. अण्णा हजारे यांचे समाजकार्यातील योगदान प्रेरणादायी असून त्यांना उत्तम आरोग्य लाभून पुन्हा पूर्ववत सामाजिक कार्यात सक्रिय व्हावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी लाभेश औटी, सुरेश पठारे, रोहन मांडे, जयसिंग मापारी आदी उपस्थित होते.

# जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनतर्फे करियरची सुवर्ण संधी

नगर– जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनव्दारा रोजगार स्वयंरोजगारच्या सुवर्णसंधी देणारे विविध मेडिकल, नर्सिंग, पॅरामेडिकल, तांत्रिक आणि व्होकेशनल (व्यवसायिक) कोर्सेस संस्थेतुन चालविले जातात. ही संस्था भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालय, तसेच महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळ मुंबई व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पूणेशी मान्यताप्राप्त संलग्न आहे.

मानवी जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी आरोग्याबरोबरच ज्ञानाची जोड असली पाहीजे. जीवनज्योत मेडिकल फाउंडेशन हि संस्था शैक्षणिक, सामाजिक, व्यवसायिक आणि वैदयकिय शोध संस्था आहे. हि संस्था वैदयकिय सुविधा, शिक्षण, जनजागृतीसाठी उदयास आलेली आहे. तसेच स्वयंरोजगाराच्या संधी आणि मानवी राहणीमान उंचावण्यासाठी या संस्थेतून मिळू शकते.

वनविभाग ऑफीसमागे, नगर – छत्रपती संभाजी नगर रोड येथील बॉम्बे नर्सिंग होम इमारतीमध्ये कार्यालय आहे. मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा हे ध्येय ठेवुन सन १९९४ साली संस्थेची स्थापना झाली. तीन मजली सुसज्ज इमारतीमध्ये अत्याधुनिक शिक्षण पध्दतीव्दारे तज्ञ मार्गदर्शन वर्ग या संस्थेमध्ये उच्च विभूषित तसेच नावाजलेल्या व्यक्तींचा स्टाफ त्यामध्ये डॉक्टर्स, नर्सेस, समुपदेशक, पॅथॉलोजिस्ट, तसेच शिक्षकांचा समावेश आहे. संस्थेमार्फत शिकविल्या जाणा-या अभ्यासक्रमाची या पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे १०० टक्के नोकरीची संधी उपलब्ध आहे.

दहावी / बारावी व पदवीधर पास नापास मुलामुलींसाठी विविध कोर्सेस येथे चालवले जातात. दोन / एक वर्षात स्वकर्तृत्वावर उभे राहण्याची संधी व शासकीय नोकरीची पात्रता व संधी असलेले कोर्सेस येथे उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच पमाणपत्र दिले जातात. प्रमाणपत्राची नोंद सेवा योजना कार्यालयास व रोजगार कार्यालय (एम्प्लॉयमेंट) मध्ये होते.

पॅरामेडिकल कोर्सेस, नर्सिंग क्षेत्रामधे ऑपरेशन थिएटर टेक्निशियन, नर्सिंग केअर तसेच डिप्लोमा कोर्स इन फिजिओथेरापी, मेडिकल लॅब टेक्निशियन, रेडीओलॉजी टेक्निशियन, (एक्स रे / इ.सी.जी /सिटी स्कॅन/ एम.आर.आय/सोनोग्राफी / कॅथलॅब) डायलेसिस, हेल्थ अॅन्ड सॅनिटरी इन्सपेक्टर, ऑप्टोमेट्री, ऑप्टीशियन (चष्म्याचे नंबर काढणे, चष्मे, काचा व फ्रेम बनविणे, कार्टेक्ट लेन्सची माहीती व बसविणे. डेंटल मेकॅनिक टेक्निशियन (कृत्रिम दात व कवळी बनविणे, दुरुस्ती करणे), डेंटल हायजिनिस्ट टेक. (तोंडाच्या आजाराची माहिती व तोंडाची देखरेख करणे), डेंटल असिस्टंट व डायटीशन असिस्टंट इत्यादी कोर्सेसचा समावेश आहे.

व्यवसायिक / तांत्रिक कोर्सेसमध्ये ब्यूटीपार्लर ॲण्ड हेअर ड्रेसिंग, फायर ॲण्ड सेफ्टी मॅनेजमेट, बांधकाम पर्यवेक्षक स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (आय.टी.आय. समकक्ष) कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी। व प्री प्रायमरी टिचर्स (बालवाड़ी / अंगणवाडी शिक्षिका) कोर्सेस चालविले जातात. हे कोर्स उत्तीर्ण झाल्यावर विदयार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय करता येतो. शासकिय व खाजगी नोकरीची संधी. बांधकाम पर्यवेक्षक (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) कोर्स उत्तीर्ण झाल्यावर जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, बी ॲण्ड सी व इतर विभागात शासकीय नोकरीची संधी उपलब्ध असुन पगार रु. ९३००–३४८०० ग्रेड पे रुपये ५६०० अशा प्रमाणात नेमणूक प्रक्रिया केली जाते, अशी माहीती प्राचार्यांनी दिली. अधिक माहीतीसाठी बॉम्बे नर्सिंग होम बिल्डींग, वनविभाग कार्यालयामागे, नगर येथे संपर्क साधावा. मो. ८८३०६८५७३२ तसेच ऑनलाईन ॲडमिशनसाठी www.jjmf.info वर भेट दया...

संस्थेत पॅरामेडिकल शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांना सुसज्ज हॉस्पीटलमध्ये प्रत्यक्ष सराव करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. संस्थेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अहिल्यादनगर येथील मोठ्या हॉस्पीटलमध्ये कार्यरत असल्याचे संचालकांनी सांगितले.

सध्या वैदयकिय व्यवसाय व आधुनिक तंत्रज्ञानामुळे पॅरामेडीकल (अर्धवैदयकिय व व्यावसायिक / तांत्रिक क्षेत्रात स्टाफची मागणी वाढलेली आहे. जीवन ज्योत ही संस्था शासन मान्यता प्राप्त असल्यामुळे विदयार्थ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होऊन त्यांचे राहणीमान उंचावले आहे. विदयार्थ्यांसाठी सर्व सोयीयुक्त सुसज्ज असे मुलीचे स्वतंत्र वसतीगृह आहे.

लॅबरेटरी अत्याधुनिक उपकरणांसह संलग्न हॉस्पीटल, वर्कशॉप, लॅबरेटरी, ऑडीओ व्हिडीओ लायब्ररी, कॉम्प्युटर / प्रोजेक्टरव्दारा प्रशिक्षण, मेस, एस. टी व रेल्वे पासची सुविधा, मोफत इंग्लिश स्पिकिंग व बेसिक कॉम्प्युटर कोर्स, माफक शुल्क हप्त्याने फी भरण्याची सोय एज्युकेशन लोनची सुविधाचे मार्गदर्शन व सहारुयता यासह रोजगार उपलब्धतेसाठी मार्गदर्शन व सहास्यता विद्यार्थ्यांना केली जाते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# सेस कर त्वरित रद्द न केल्यास आडत व्यापारी करणार २ ऑक्टोबरला राज्यव्यापी आंदोलन

**अहिल्यानगर आडते बाजार व्यापारी असोसिएशनचा इशारा**

नगर – राज्यातील मार्केट कमिटींचा सेस कर त्वरित रद्द करावा, या मागणीसाठी अहिल्यानगर आडते बाजार मर्चंट असोसिएशनचे पदाधिकारी आक्रमक झाले असून राज्य शासनाने व्यापाऱ्यांवर अन्यायकारक असलेला हा कर त्वरित रद्द न केल्यास अहिल्यानगरसह राज्यातील सर्व व्यापारी येत्या २ ऑक्टोबरला राज्यव्यापी तीव्र आंदोलन करून सेस देणे व घेणे पूर्णपणे बंद करणार असल्याचा इशारा अहिल्यानगर आडते बाजार व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अशोक गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिला. यासंदर्भात कोल्हापूर येथे ४ ऑगस्ट रोजी राज्यव्यापी व्यापारी परिषद झाली. या परिषदेमध्ये करण्यात आलेल्या ठरावानुसार येत्या २ ऑक्टोबरला पूर्ण राज्यात तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे.



सेस टॅक्स त्वरित रद्द करण्याच्या मागणीसाठी अहिल्यानगर आडते बाजार मर्चंट असोसिएशनचे पदाधिकारी आक्रमक झाले असून येत्या २ ऑक्टोबरला तीव्र आंदोलनचा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला आहे.

यावेळी अधिक माहिती देताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र बोथरा म्हणाले, गेल्या ६३ वर्षांपासून राज्यातील मार्केट कमिटींना सेस कर लावला जात आहे. २०१७ साली पूर्ण देशात जीएसटी टॅक्स आला त्यावेळेस एक नेशन एक टॅक्स हे शासनाने जाहीर केले होते; मात्र नऊ वर्षे झाले तरी अद्यापही सेस टॅक्स चालूच आहे. हा कर व्यापरांवर अन्यायकारक असून व्यापाऱ्यांच्या अडचणी वाढवणारा आहे. तसेच शेतकऱ्यांचेही आर्थिक नुकसान करणारा व सर्वसामान्य ग्राहकांना भुर्दंड देणार आहे. त्यामुळे हा टॅक्स रद्द व्हावा यासाठी शेतकरी सुद्धा व्यापारी बरोबर आहेत. त्यामुळे राज्य शासनाने त्वरित निर्णय घेऊन हा टॅक्स रद्द करावा व त्याचे अनुदान कृषी उत्पन्न बाजार समितीला द्यावे, अशी मागणी केली. शासन लाडकी बहिण, शेतकरी कर्जमाफी आशा विविध योजनांना करोडो रुपयांचे अनुदान देत आहे. मग सेसा कर रद्द करून कृषी उत्पन्न बाजार समितीलाही अनुदान देणे शक्य आहे, असेही ते म्हणाले.

उपाध्यक्ष गोपाल मणियार म्हणाले, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात मॉल संस्कृती वाढत असल्याने ग्राहकांची ओढ त्याकडे आहे. याचा मोठ्याप्रमाणात परिणाम बाजारपेठेवर होत आहे. त्यामुळे व्यापारी मोडकळीस येत आहे. राज्य शासनास सर्वात जास्त टॅक्स हा व्यापारी वर्गाकडून जातो. त्यामुळे शासनाने व्यापारी वर्गाला अडचणीत न आणता लवकरात लवकर सेस रद्द करावा. तसेच नवीन कायदे करताना व्यापाऱ्यांशी चर्चा करूनच मंत्र्यांनी निर्णय घ्यावे, अशीही मागणी केली.

या पत्रकार परिषदेला आडते बाजार मर्चंट असोसिएशनचे सचिव संतोष बोरा, संचालक दीपक बोथरा, विश्वनाथ कासट, अशोक भंडारी, सतीश गुंदेचा, श्याम सचदेव, हिरालाल चोपडा, संजय लोढा, योगेश चंगेडीया, अभय लुंकड, रमेश सोनीमंडेलेचा, अजित भंडारी, रितेश पारख, भूषण भंडारी व व्यापारी सभासद उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी प्रा. सीताराम काकडे यांची निवड



नगर – राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर (दक्षिण) जिल्हाध्यक्षपदी प्रा.सीताराम काकडे यांची निवड करण्यात आली असून, त्यांना प्रदेशाध्यक्ष व राज्याचे माजी मंत्री आमदार शशिकांत शिंदे यांनी नियुक्तीचे पत्र दिले आहे. प्रा.सीताराम काकडे हे गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सक्रिय असून जिल्हा कार्यकारिणी सदस्य, जिल्हा सरचिटणीस,जिल्हा उपाध्यक्ष, बूथ समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष अशा विविध पदावर काम केलेले असून सध्या ते पक्षाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत होते.

विद्यार्थी दशेपासूनच सत्यशोधकी विचारधारेमध्ये जडणघडण झालेले झालेले प्रा. काकडे हे सामाजिक-राजकीय क्षेत्राबरोबरच साहित्य, संस्कृती, शिक्षण व आध्यात्मिक क्षेत्रात आजपर्यंत काम करत आलेले आहेत. त्यांची काही पुस्तके प्रकाशित असून आज पर्यंत त्यांनी महाराष्ट्रभर पाच हजारांहून अधिक प्रबोधन पर व्याख्याने दिलेली आहेत. तसेच अनेक वृत्तपत्रांच्या माध्यमातून प्रासंगिक लिखाण ते करत असतात. शिव-शाहू -फुले- आंबेडकर यांची पुरोगामी विचारधारा जपत असलेल्या प्रा. काकडे यांची शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी झालेली निवड ही सामाजिक जाणीवेच्या भावनेतून काम करणाऱ्या एका प्रामाणिक कार्यकर्त्यासाठी मोठी संधी असल्याची भावना खासदार निलेश लंके यांनी श्री.काकडे यांच्या निवडीनंतर व्यक्त केली आहे.

तर आज पर्यंत मी अनेक सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सतत कार्यरत राहिलेला असून,पक्षाच्या या पदाचा उपयोग सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व संघटना वाढविण्यासाठी करणार असल्याचे प्रा.काकडे यांनी यावेळी सांगितले, तसेच पक्ष नेतृत्वाने माझ्यावर मोठा विश्वास दाखवून जिल्हाध्यक्षपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष, संसद रत्न खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके, आमदार व पक्षाचे राज्य सरचिटणीस रोहित पवार यांचे आभारही प्रा.काकडे यांनी मानले आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न ४३० खाटांच्या रुग्णालयासाठी ९८१ पदनिर्मितीस मान्यता

**ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणार**

मुंबई – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न ४३० खाटांच्या रुग्णालयासाठी आवश्यक पदनिर्मितीस मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्या अन्वये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केला असून रुग्णालयाच्या कार्यक्षम संचालनासाठी एकूण ९८१ पदांची निर्मिती टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे.

राज्यातील निमशहरी, ग्रामीण, दुर्गम व अतिदुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे तसेच वैद्यकीय शिक्षणाच्या संधी वाढविणे या उद्देशाने राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथे १०० विद्यार्थी प्रवेशक्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता.

शासन निर्णयानुसार रुग्णालयासाठी नियमित स्वरूपातील गट-अ, गट-ब व गट-क मधील ५१५ पदे तसेच बाह्यस्त्रोताद्वारे (आउटसोर्सिंग) ४६६ मनुष्यबळ सेवा अशा एकूण ९८१ पदांची निर्मिती करण्यात येणार आहे. ही पदे चार टप्प्यांत भरली जाणार असून पहिल्या टप्प्यातील पदनिर्मिती तत्काळ करण्यात येणार आहे. विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता. या पदनिर्मितीमुळे वैद्यकीय अधीक्षक, निवासी वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, अधिपरिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधनिर्माता, लिपिक, वाहनचालक तसेच विविध सहाय्यक व तांत्रिक पदांसह अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. रुग्णालयाच्या सर्व विभागांचे सक्षम मनुष्यबळ उभारून नागरिकांना अधिक प्रभावी व दर्जेदार आरोग्यसेवा देण्यास मदत होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील आरोग्य सुविधा बळकट करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून वैद्यकीय शिक्षण, आरोग्यसेवा आणि स्थानिक रोजगारनिर्मितीच्या संधी यांना यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

# वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष सीए सौरभ अजमेरा यांची अहिल्यानगर शाखेला भेट

नगर – वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल ऑफ द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अक्कौंटंट्स ऑफ इंडिया चे अध्यक्ष सीए सौरभ अजमेरा यांनी नुकतीच आयसीएआय अहिल्यानगर शाखेला औपचारिक भेट दिली यावेळी वेस्टर्न इंडिया रीजनल कौन्सिल ऑफ द इंस्टीट्यूट ऑफ चार्टर्ड अक्कौंटंट्स ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष सीए रिकीन पटेल, सचिव सीए बिशन शाह, खजिनदार सीए राकेश शाह, अध्यक्ष सीए राजेश अग्रवाल उपस्थित होते.



वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष सीए सौरभ अजमेरा यांची अहिल्यानगर शाखेला भेट दिली असता त्यांचे समवेत नगर शाखेचे पदाधिकारी.

सीए अभयकुमार कटारिया यांनी आपल्या स्वागतपर मनोगतात त्यांनी मान्यवरांच्या भेटीबद्दल आनंद व्यक्त करत, अशा भेटींमुळे विद्यार्थ्यांना आणि सभासदांना प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले. तसेच सीए इंटरमिजिएट व सीए फाउंडेशन परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या परिश्रम, जिद्द आणि चिकाटीचे कौतुक केले.

अध्यक्ष सीए सौरभ अजमेरा यांनी उपस्थित विद्यार्थी, सभासद आणि स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. आपल्या मनोगतात त्यांनी चार्टर्ड अकाउंटन्सी व्यवसायातील बदलते स्वरूप, व्यावसायिक प्रामाणिकपणा, कौशल्यविकास, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि सातत्याने ज्ञान अद्ययावत ठेवण्याचे महत्त्व यावर सविस्तर विचार मांडले. आजच्या स्पर्धात्मक युगात तांत्रिक ज्ञानाबरोबरच संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि नैतिक मूल्ये आत्मसात करणे तितकेच आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सभासदांना संबोधित करताना त्यांनी व्यावसायिक ज्ञान सातत्याने अद्ययावत ठेवणे, बदलत्या कायदे व नियमांची माहिती घेणे, नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आणि संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. शाखेच्या माध्यमातून आयोजित होणाऱ्या व्यावसायिक विकास कार्यक्रमांचा लाभ घेऊन ज्ञानवृद्धी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी सीए सौरभ अजमेरा यांनी माजी अधक्ष्यांची भेट घेतली, तसेच, आमी व एमसीसीआयए च्या सदस्यांशी भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यावर दिर्घकालीन उपाय योजना करण्यात येईल असे संगितले. इन्कम टॅक्स व जीएसटी ऑफिस, कॉलेजेस मध्ये भेट दिली.

यावेळी अहिल्यानगर शाखा अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया, उपाध्यक्ष व विकासा अध्यक्ष सीए महेश तिवारी, सचिव सीए महेश भळगट, खजिनदार सीए सुनंदा रच्चा, सदस्य सीए काजल चंदे व सीए प्रसाद पुराणिक, माजी अध्यक्ष सीए मोहन बरमेचा, सीए संजय देशमुख, सीए मिलिंद जांगडा, सीए सुशील जैन, सीए प्रसाद भंडारी, सीए ज्ञानेश कुलकर्णी, सीए (डॉ) परेश बोरा, सीए किरण भंडारी, सीए ज्ञानेश्वर काळे, सीए पवनकुमार दरक, सीए सनित मुथा, सीए सभासद व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीए सुनंदा रच्चा व सीए काजल चंदे यांनी केले तर आभारप्रदर्शन सीए महेश तिवारी यांनी केले.

# श्रमिक व ऑटो-रिक्षा संघटनेचा १५ ऑगस्टपासून आंदोलनाचा इशारा

**जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन**

नगर – प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात एजंट आणि दलालांच्या माध्यमातून होणारी वाहनधारकांची लूट, केमिकलयुक्त दूध तसेच विनालेबल व अनधिकृत प्लास्टिक पिशव्यांमधून होणारी दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री, नियमबाह्य प्रवासी वाहतूक अशा विविध प्रश्नांवर कार्यवाही करण्याची मागणी करीत श्रमिक संघटना व ऑटो-रिक्षा संघटनेने १५ ऑगस्टपासून आंदोलनाचा इशारा दिला आहे. तसेच पालकमंत्र्यांना १५ ऑगस्ट रोजी काळे झेंडे दाखविण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.



याबाबत अहिल्यानगर जिल्हा श्रमिक संघटित कष्टकरी कामगार संघटना आणि अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांना संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास कराळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी नासिर खान, बाळासाहेब साळवे, अन्वर शेख, जावेद शेख, आसिफ सय्यद, दिलावर सय्यद, ज्ञानेश्वर शिपणकर, महेश सुतार, बाबा दहिफळे, गणेश पारखे, यशराज बनसोडे, जॉन भालेराव, आसिफ शेख, सिताराम आंबेकर, तौफिक अत्तार, फारुख शेख, गोरख सुरंगे, सोपान दळवी, किशोर कुलट, अकिल रज्ञाक, विष्णू दहातोंडे, निलेश मिसाळ, सिद्धांत भिंगारदिवे, आकाश वैरागर, अभिषेक सकट, ईश्वर लंगारे, विकास आव्हाड उपस्थित होते.

निवेदनात शहर व उपनगरांमध्ये कथितरित्या केमिकलयुक्त दूध तसेच विनालेबल व अनधिकृत प्लास्टिक पिशव्यांमधून दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा विक्रीवर संबंधित यंत्रणांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याचा दावा संघटनेने केला असून याबाबत तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात एजंट आणि दलालांच्या माध्यमातून वाहनधारकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. वाहनांच्या विविध कामांसाठी दलालांची साखळी कार्यरत असून त्याची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

अहिल्यानगर शहरात मोठ्या प्रमाणावर विनापरवाना, स्क्रॅप अथवा नियमबाह्य रिक्षा प्रवासी वाहतूक करत असल्याचा आरोप करत अशा वाहनांवर तातडीने कारवाई करून ती कायमस्वरूपी बंद करण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. वाहतूक शाखेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कथित हप्तेवसुली होत असून त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेशी तडजोड केली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणाची राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत (सीआयडी) चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी बस, मारुती व्हॅन व इतर वाहनांकडूनही हप्तेवसुली होत असल्याचा आरोप करत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मोबाईल कॉल डिटेल्सची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ओव्हरलोड वाहनांकडून मोठ्या प्रमाणात हप्ते घेतले जात असल्याचाही दावा निवेदनात करण्यात आला आहे.

आरटीओ कार्यालयात काही एजंट पिढ्यानपिढ्या कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून वाहनधारकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच बनावट विमा प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथे पारायण सोहळ्याला सुरुवात

नगर – माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व पारायण सोहळ्याला सुरुवात झाली असून पारायण सोहळ्याचे नेतृत्व ह.भ.प. प्रभाताई भोंग करीत आहेत. अध्यात्म, भक्ती व समाजप्रबोधन यांचे अद्वितीय त्रिवेणी संगम साधणाऱ्या या पारायण सोहळ्यात भक्तिरसाने भारलेले वातावरण निर्माण झाले आहे.



ज्ञानेश्वरी पूजन करताना नगरसेविका पुष्पा बोरुडे, सुरेखा कदम, मंगल लोखंडे, उज्वला शेरकर, अनिता खरपुडे, सावेरी सत्रे आदी.

या पारायण सोहळ्याचे ज्ञानेश्वरी पूजन नगरसेविका पुष्पा बोरुडे, सुरेखा कदम, मंगल लोखंडे, उज्वला शेरकर, अनिता खरपुडे, सावेरी सत्रे आदी च्या हस्ते करण्यात आले. पारायण सोहळा भाविकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू ठरत असून, महिलावर्गासह तरुणांमध्येही मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून येत आहे. प्रभाताई भोंग यांच्या ओजस्वी वाणीतील हरिपाठ, संतवाङ्मयाचे सादरीकरण, आणि सामाजिक जाणीवेने युक्त उपदेश यामुळे श्रोते मंत्रमुग्ध होत आहेत. त्यांनी संत सावता महाराजांच्या जीवनकार्याचा परामर्श घेत भक्तीमार्गातील सात्त्विकता व कर्मशीलतेचे महत्त्व अधोरेखित केले.

हा पारायण सोहळा उत्सव समितीचे प्रमुख छबूनाना जाधव, कैलास खरपुडे, चंद्रकांत ताठे, अशोक कापरे आदींच्या मार्गदर्शनातून पार पडत आहे. त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वामुळे संपूर्ण सप्ताह उत्सव अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे.

पारायण, हरिपाठ, भजन, कीर्तन आणि महाराजांच्या शिकवणीवर आधारित व्याख्याने यामुळे संपूर्ण परिसर अध्यात्मिकतेने भारावून गेला आहे. अनेक भाविक सकाळपासून रात्रीपर्यंत कार्यक्रमात सहभागी होत असून, पुण्यस्मरणाच्या या पर्वाने माळीवाडा परिसराला भक्तिरसात चिंब भिजवले आहे. येत्या काही दिवसांत नामवंत कीर्तनकार व प्रवचनकार यांच्या विचारांचे लाभ घेता येणार असून,श्री संत सावता महाराज यांच्या प्रेरणेने सुरू झालेला हा सप्ताह, समाजाला एकत्र आणणारा आणि आध्यात्मिक उन्नतीकडे नेणारा ठरतो आहे.



वीज ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे सदस्य अ‍ॅड.सुरेंद्र सोनवणे यांचे स्वागत करताना अहिल्यानगर ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर.

# नागरिकांनी तक्रार निवारण्यासाठी वीज ग्राहक तक्रार यंत्रणेचा वापर करावा

**अ‍ॅड. सुरेंद्र सोनवण यांचे आवाहन; नगर येथील ग्राहक पंचायतीच्या कार्यालयाला दिली भेट**

नगर – दिवसेंदिवस विविध कारणांनी सातत्याने वीज ग्राहकांच्या अनेक तक्रारी वाढत आहेत. या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी वीज ग्राहकांनी ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे तक्रार करून या स्वतंत्र यंत्रणेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे सदस्य आणि ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे नाशिक विभाग सचिव अ‍ॅड. सुरेंद्र सोनवणे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या सुनावणीसाठी वीज ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे सदस्य अ‍ॅड.सुरेंद्र सोनवणे हे अहिल्यानगरमध्ये आले होते. याप्रसंगी अहिल्यानगर ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले. ग्राहक पंचायतच्या जिल्हा शाखेच्या कार्यालयाची पाहणी करून ग्राहकांसाठी उपयुक्त अशा ग्राहक संरक्षण कायदा व चळवळींवरील अनेक पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

अ‍ॅड.सुरेंद्र सोनवणे म्हणाले, वीज नियामक आयोगाने वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी त्रिसदस्य समिती नेमली आहे. वीज ग्राहकांच्या लेखी तक्रारींवर त्यांच्या समोर सुनावणी होर असल्याने ग्राहकांना कोणताही वकील देण्याचे गरज नाहीये. ग्राहक स्वतः या प्रकरणात आपली बाजू मांडू शकतो. अनेकांना या यंत्रणेची माहिती नसल्यामुळे या तक्रारी कुठे दाखल करावी, कशा कराव्यात, याची माहिती ग्राहक पंचायतीने ग्राहकांना करून द्यावे, असे आवाहन केले. याप्रसंगी ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर यांनी ग्राहक पंचायतीचा वार्षिक अहवाल सादर केला. ग्राहक पंचायतीचे केंद्राचे प्रमुख जिल्हा सचिव अ‍ॅड. सिद्धार्थ वाघमारे यांनी प्रास्ताविक केले.

याप्रसंगी झालेल्या प्रश्नोत्तरामध्ये महापालिकेचे माजी सहआयुक्त संजीव परशरामी, माजी नायब तहसीलदार सर्वोत्तम क्षीरसागर, ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार, जिल्हा संघटिका शलाका रसाळ, स्वाती ठाकूर, कोषाध्यक्ष कृष्णा बागडे, ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा संचालक अमित काळे, संजय जोशी, रवी सातपुते सहभागी झाले होते.

# नीट परीक्षेतील गैरप्रकारांची न्यायालयीन चौकशी करावी

**खासदार नीलेश लंके यांची केंद्रीय शिक्षण मंत्र्यांकडे मागणी**

नगर – खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांची भेट घेऊन नीट परीक्षेतील गैरप्रकारांच्या संपूर्ण प्रकरणाची निवृत्त सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र, निष्पक्ष आणि वेळबद्ध न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. यासंदर्भातील सविस्तर निवेदनही त्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांकडे सादर केले.



नीट परीक्षेतील गैरप्रकारांची न्यायालयीन चौकशी करावी या मागणीचे निवेदन केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांना देताना खा. नीलेश लंके.

खासदार लंके यांनी दिलेल्या निवेदनात देशभरातील विद्यार्थी व पालकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचा उल्लेख करण्यात आला आहे. नीट परीक्षेतील गुणफेरफार, ओएमआर शीटमधील तफावत, मूल्यमापन प्रक्रियेतील विसंगती तसेच परीक्षा प्रक्रियेच्या विश्वासार्हतेबाबत विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या शंका याकडे त्यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील काही विद्यार्थ्यांच्या प्रकरणांचाही संदर्भ देत गुणांमधील कथित तफावतीची उदाहरणे निवेदनात नमूद करण्यात आली आहेत. या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असल्याची गंभीर बाब खासदार लंके यांनी मांडली.

या प्रकरणातील सत्य देशासमोर यावे आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, यासाठी संपूर्ण परीक्षा प्रक्रियेचे स्वतंत्र फॉरेन्सिक ऑडिट करण्यात यावे, अशीही त्यांनी मागणी केली आहे. ओएमआर शीट, सर्व्हर लॉग, मूल्यांकन प्रणाली आणि संबंधित डेटाबेसची तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात यावी, असे त्यांनी निवेदनात नमूद केले.

याशिवाय विद्यार्थ्यांच्या तक्रारींची सुनावणी करण्यासाठी उच्चस्तरीय विशेष समिती स्थापन करणे, दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करणे, विद्यार्थ्यांना ओएमआर कार्बन कॉपी देण्याची पूर्वीची व्यवस्था पुन्हा सुरू करणे, आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक व मानसिक आधार देणे तसेच विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावरील मानसिक आरोग्य सहाय्य यंत्रणा उभारण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

यावेळी खासदार नीलेश लंके म्हणाले, देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य नीट परीक्षेवर अवलंबून आहे. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, निष्पक्षता आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळणे ही केंद्र सरकारची नैतिक व घटनात्मक जबाबदारी आहे. सरकारने तातडीने हस्तक्षेप करून सत्य जनतेसमोर आणावे आणि दोषींवर कठोर कारवाई करावी.

दरम्यान, नीट संदर्भातील ओएमआर शीटमधील तफावत आणि मूल्यमापन प्रक्रियेबाबत दाखल झालेल्या काही याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी अपेक्षित असल्याने देशभरातील विद्यार्थी व पालकांचे लक्ष या प्रक्रियेकडे लागले आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## एसी जॉईंट आर्थरायटिस म्हणजे कआय ?

खांदा हा शरीरातील सर्वाधिक हालचाल करणाऱ्या सांध्यांपैकी एक आहे. दैनंदिन जीवनातील हात वर उचलणे, वस्तू उचलणे, कपडे घालणे, केस विंचरणे किंवा वाहन चालविणे अशा असंख्य हालचालींसाठी खांद्याचे आरोग्य महत्त्वाचे असते. खांद्याची रचना अत्यंत गुंतागुंतीची असते. अनेकदा खांद्याच्या वेदनांचा संबंध आपण 'रोटेटर कफ' किंवा 'फ्रोजन शोल्डर'शी जोडतो, पण खांद्याच्या वरच्या भागात होणाऱ्या तीव्र वेदनांमागे 'अॅक्रोमियोक्लेव्हिक्युलर जॉईंट आर्थरायटिस' हे एक महत्त्वाचे कारण असू शकते. हा सांधा म्हणजे आपल्या कॉलर बोन (क्लेव्हिकल) आणि खांद्याच्या हाडाचा वरचा भाग (अॅक्रोमियन) यांना जोडणारा दुवा होय. या सांध्यातील गादीची (कार्टिलेज) झिज होते, तेव्हा त्याला एसी जॉईंट आर्थरायटिस असे म्हटले जाते.

### कशामुळे होतो हा त्रास?

एसी जॉईंट आर्थरायटिस होण्यास काही कारणे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे वाढत्या वयानुसार सांध्यांमधील नैसर्गिक गादी हळूहळू झिजते. त्यामुळे पन्नाशीनंतरच्या व्यक्तींमध्ये हा आजार अधिक प्रमाणात दिसून येतो. दुसरी गोष्ट म्हणजे जे लोक जिममध्ये अवजड वजन उचलतात, बॉडीबिल्डिंग करतात किंवा ज्यांच्या व्यवसायात खांद्याचा वारंवार वापर होतो, त्यांच्या या सांध्यावर अति ताण पडून झीज लवकर होऊ शकते. याशिवाय तरुणपणी खांद्याला झालेली कोणतीही गंभीर दुखापत किंवा सांधा निखळला असेल तर त्यामुळे भविष्यात तिथे आर्थरायटिस होण्याचा धोका अधिक असतो. काही व्यक्तींमध्ये सांध्यांची रचनाच अशी असते की त्यांचा हा त्रास होण्याकडे कल अधिक असतो.

### लक्षणे कोणती?

एसी जॉईंट आर्थरायटिसचे सर्वात मुख्य लक्षण म्हणजे खांद्याच्या अगदी वरच्या टोकाला होणारी वेदना. अनेक रुग्ण



सांगतात की जेव्हा ते हात छातीसमोरून दुसऱ्या खांद्याकडे नेतात तेव्हा वेदना तीव्र होतात. तसेच झोपताना त्या खांद्यावर कुशीवर झोपणे कठीण होते. सांध्यामध्ये 'कट–कट' असा आवाज येणे, हालचाल करताना कडकपणा जाणवणे किंवा जड वस्तू उचलण्यास असमर्थता असणे ही देखील याची प्रमुख लक्षणे आहेत.

निदानासाठी डॉक्टर सहसा शारीरिक तपासणी करतात, ज्यामध्ये खांद्याच्या हालचालींची चाचणी घेतली जाते. त्यानंतर एक्स–रे किंवा एमआरआयद्वारे सांध्याच्या झिजेची तीव्रता समजून घेतली जाते. वेदना आणि सूज कमी करण्यासाठी रुग्णांना दाहशामक औषधे सुरुवातीला दिली जाऊ शकतात. वेदना तीव्र असतील आणि औषधांनी फरक पडत नसेल, तर सांध्यामध्ये स्टेरॉइडचे इंजेक्शन देऊन तात्पुरता आराम दिला जाऊ शकतो. इतर सर्व उपाय अपयशी ठरतात, तेव्हा 'डिस्टल क्लेविक्युलर रिसेक्शन' नावाची छोटी शस्त्रक्रिया केली जाते. यात सांध्याचा झिजलेला भाग काढून टाकला जातो, ज्यामुळे हाडे एकमेकांवर घासणे थांबते आणि वेदनांपासून कायमची मुक्ती मिळते.

एसी जॉईंट आर्थरायटिस हा आजार जीवघेणा नसला, तरी तो आपल्या दैनंदिन कामात मोठा अडथळा ठरू शकतो. वेळेवर निदान आणि योग्य व्यायामाच्या मदतीने आपण यावर मात करू शकतो. खांद्याच्या दुखण्याकडे दुर्लक्ष न करता, जर ते दुखणे सातत्याने जाणवत असेल, तर वेळीच अस्थिरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे हिताचे ठरते. व्यायामासोबतच पौष्टिक आहार आणि सांध्यांवर अतिरिक्त ताण न देण्याची खबरदारी घेतल्यास आपण या आजारावर उत्तम नियंत्रण मिळवू शकतो.

खांद्याचे स्नायू मजबूत ठेवण्यासाठी नियमित शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यायाम करणे, व्यायाम किंवा खेळ सुरू करण्यापूर्वी वॉर्म–अप न विसरता करणे, जड वजन योग्य तंत्रानेच उचलणे, खांद्याला दुखापत झाल्यास त्वरित उपचार घेणे आणि वेदना दीर्घकाळ दुर्लक्षित न करणे हे प्रतिबंधासाठी महत्त्वाचे उपाय आहेत.

**- डॉ. सम्यक पंचोली,**
शोल्डर आणि अप्पर लिंब सर्जन,
संपर्क ८९८९३२९३२९

## 'ज्युलिएट रोज'च्या दुनियेत

फुलांच्या जगात सौंदर्य, सुगंध आणि दुर्मीळतेला मोठे महत्त्व असते. मात्र या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन एक गुलाब असा आहे, जो 'जगातील सर्वात महागडा गुलाब' म्हणून ओळखला जातो. हा गुलाब म्हणजे 'ज्युलिएट रोज'! प्रसिद्ध इंग्लिश गुलाब तज्ज्ञ डेव्हिड ऑस्टिन यांनी या गुलाबाची निर्मिती केली. विशेष बाब म्हणजे, या एका गुलाबाच्या जातीसाठी तब्बल १५ वर्षांचे संशोधन करण्यात आले. या दीर्घ संशोधन प्रक्रियेसाठी सुमारे १५ दशलक्ष अमेरिकी डॉलर (भारतीय चलनात अंदाजे १२० कोटी रुपये) खर्च झाला. यामुळेच 'ज्युलिएट रोज' हा आजवरचा सर्वात महागडा गुलाब मानला जातो.




'ज्युलिएट रोज'चा रंग आडू किंवा पीच–एप्रिकॉट छटेचा असून, त्याच्या पाकळ्या अत्यंत नाजूक आणि परिपूर्ण सममितीत मांडलेल्या असतात. या गुलाबाला सौम्य पण मनमोहक असा सुगंध लाभलेला आहे. त्यामुळेच लग्नसमारंभ, राजेशाही कार्यक्रम आणि खास प्रसंगी या गुलाबाला विशेष मागणी असते. २००६ साली लंडनमधील चेल्सिया फ्लॉवर शो मध्ये 'ज्युलिएट रोज' प्रथमच जगासमोर सादर करण्यात आला. तेव्हापासून या गुलाबाला 'थ्री मिलियन पाउंड रोज' असेही संबोधले जाते.

त्याच्या सौंदर्याबरोबरच त्यामागील प्रचंड संशोधन खर्चामुळे तो फूल विश्वात चर्चेचा विषय ठरला. तज्ज्ञांच्या मते, 'ज्युलिएट रोज'चे प्रत्येक फूल स्वतंत्रपणे कोट्यवधी रुपयांचे नसते. मात्र, या गुलाबाच्या जातीच्या निर्मितीसाठी लागलेला एकूण खर्च हा आजवरच्या सर्व गुलाबांमध्ये सर्वाधिक असल्याने तो 'सर्वात महागडा गुलाब' म्हणून ओळखला जातो. एकूणच, सौंदर्य, मेहनत, संशोधन आणि प्रतिष्ठेचे प्रतीक ठरलेला 'ज्युलिएट रोज' हा गुलाब आजही फुलांच्या जगात आपले वेगळे स्थान टिकवून आहे.

## बुर्ज खलिफावर वीज कोसळते तेव्हा....

संयुक्त अरब अमिरातीमधील दुबईचे क्राऊन प्रिन्स शेख हमदान बिन मोहम्मद बिन राशिद अल मकतूम यांनी सोशल मीडियावर एक असा व्हिडीओ शेअर केला आहे, जो पाहून जगभरातील लोक थक्क झाले आहेत. जगातील सर्वात उंच इमारत असलेल्या 'बुर्ज खलिफा'च्या उत्तुंग टोकावर एक अत्यंत तीव्र वीज कडाडत कोसळली. या नैसर्गिक घटनेचा व्हिडीओ इतका जबरदस्त आहे की, पाहणाऱ्याला आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नाहीये!

काही सेकंदांच्या या व्हिडीओमध्ये दिसते की, काळ्या ढगांनी झाकलेले आकाश अचानक एका तीव्र प्रकाशाने उजळून निघते. पुढच्याच क्षणी, आकाशातून थेट बुर्ज खलिफाच्या सर्वात वरच्या



टोकावर (स्टील स्ट्रक्चर) वीज येऊन धडकते. यावेळी होणारा ढगांचा कडकडाट आणि पावसाचा आवाज या दृश्याला अधिकच थरारक बनवतो. जणू निसर्ग आणि मानवी अभियांत्रिकी एकमेकांसमोर उभे आहेत, असा भास हा व्हिडीओ पाहताना होतो. शेख हमदान यांनी हा व्हिडीओ त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर करताच तो काही वेळातच व्हायरल झाला असून लाखो लोकांनी तो पाहिला आहे.

अनेकांनी याला 'एखाद्या चित्रपटातील दृश्यासारखे' म्हटले आहे, तर काहींनी याला 'आजवरचे सर्वात भीतीदायक पण सुंदर दृश्य' असे संबोधले आहे. शेख हमदान बिन मोहम्मद बिन राशिद अल मकतूम हे केवळ दुबईचे क्राऊन प्रिन्सच नाहीत, तर ते संयुक्त अरब अमिरातीचे उपपंतप्रधान आणि संरक्षणमंत्री देखील आहेत. सोशल मीडियावर ते अत्यंत लोकप्रिय असून इन्स्टाग्रामवर त्यांना १७ दशलक्षाहून अधिक लोक फॉलो करतात. इन्स्टाग्रामवर ते 'फज्जा' या नावाने प्रसिद्ध आहेत. ते आपल्या सोशल मीडियावरून निसर्ग, साहस, प्रवास आणि दुबईच्या विकासाशी संबंधित गोष्टी चाहत्यांसाठी नेहमी शेअर करत असतात.

## गुडघेदुखीवर शस्त्रक्रिया करण्यापूर्वी...

मानवी शरीराच्या एकूण वजनाचा जवळपास ९० टक्के भार पेलण्याचे कठीण काम आपल्या गुडघ्यांवर असते. चालणे, बसणे, पायर्या चढणे किंवा खाली उतरणे अशा नित्याच्या हालचाली पूर्णतः या सांध्यावर अवलंबून असतात. गुडघा ही एक अत्यंत गुंतागुंतीची आणि तितकीच वैशिष्ट्यपूर्ण रचना आहे.

गुडघ्यातील अस्थिबंध म्हणजेच लिगामेंट हे मांडीचे आणि पोटरीचे हाड एकमेकांशी जोडून ठेवतात. या रचनेत अँटीरियर क्रूसिएट लिगामेंट (एसीएल), पोस्टरियर क्रूसिएट लिगामेंट (पीसीएल), मेडियल कोलॅटरल लिगामेंट (एमसीएल) आणि लॅटरल कोलॅटरल लिगामेंट (एलसीएल) या चार प्रमुख अस्थिबंधांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. यातील एसीएल नावाचा अस्थिबंध नडगीच्या हाडाला मांडीच्या हाडाच्या पुढे जाण्यापासून रोखून गुडघ्याला स्थिरता देतो. खेळाडूंमध्ये किंवा अपघातांमध्ये जेव्हा या अस्थिबंधांना इजा होते, तेव्हा गुडघ्याचे कार्य विस्कळीत होते आणि वेदनांचा प्रवास सुरू होतो.



अनेकदा गुडघेदुखीचा त्रास सुरू झाला की रुग्ण वेदनाशामक औषधांवर अवलंबून राहतात. वेदना तीव्र असल्यास किंवा हाडामध्ये गंभीर बिघाड असल्यास शस्त्रक्रियेचा सल्ला दिला जातो. आजच्या काळात नी–रिप्लेसमेंट म्हणजेच गुडघा बदलण्याची शस्त्रक्रिया सर्रास केली जाते. मात्र, अशा शस्त्रक्रियेमध्ये नैसर्गिक सांधा काढून त्या जागी कृत्रिम सांधा बसवला जातो. नैसर्गिक सांध्याचे महत्त्व अनन्यसाधारण असते, कारण त्यानंतरच्या आयुष्यात रुग्णाला काही मर्यादा येतात. मात्र, आता विज्ञानाने इतकी प्रगती केली आहे की, नैसर्गिक सांधा न काढता गुडघा पूर्ववत करणे शक्य झाले आहे. यासाठी १९५० च्या दशकात रशियन अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. गॅब्रिएल इलिझारोव्ह यांनी विकसित केलेले तंत्रज्ञान आजही वरदान ठरत आहे.



या तंत्रज्ञानाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात बाह्य फिसिएटरचा वापर केला जातो. साध्या भाषेत सांगायचे तर, हाडाच्या बाह्य बाजूला एक धातूची फ्रेम लावली जाते आणि तिला नियंत्रित तणावाखाली ठेवले जाते. जेव्हा सांध्यांमध्ये किंवा हाडांमध्ये इन्फेक्शन असते, हाड मोडलेले असते किंवा चुकीच्या पद्धतीने जोडले गेलेले असते, तेव्हा हे तंत्रज्ञान जादूची कांडी असल्यासारखे काम करते. अनेकांना असा गैरसमज असतो की, गुडघ्यातील कार्टिलेज एकदा खराब झाले की ते पुन्हा दुरुस्त होऊ शकत नाही. परंतु रशियन तंत्रज्ञानामुळे गुडघ्यांची हालचाल पूर्ववत करणे शक्य होते, ज्यामुळे रुग्ण पुन्हा मांडी घालून बसू शकतात किंवा भारतीय पद्धतीने खाली बसू शकतात.

या उपचारपद्धतीमध्ये गुडघा वाकडा असल्यास तो फिक्सेटरच्या साहाय्याने सरळ केला जातो. सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे ज्या रुग्णांना वाकड्या गुडघ्यांमुळे केवळ एका पायावर भार देऊन चालावे लागते, त्यांना अवघ्या तीन ते चार दिवसांच्या उपचारानंतर दोन्ही पायांवर चालणे शक्य होते. केवळ गुडघेदुखीच नव्हे, तर हाडांची उंची वाढवण्यासाठी किंवा पोलिओ, सेरेब्रल पाल्सीमुळे झालेल्या शारीरिक दोषांवर मात करण्यासाठी हे तंत्रज्ञान आजही जगात श्रेष्ठ मानले जाते. २०१५ मध्ये इंटर्नल इम्प्लांट आणि रशियन तंत्रज्ञानाचा मेळ घालून आम्ही भारतात पहिल्यांदाच एका जटिल शस्त्रक्रियेद्वारे उंची वाढवण्याचा प्रयोग यशस्वी केला होता.

एलिझारोव्हचे वैशिष्ट्य म्हणजे डायबिटीक फूटमध्ये रक्ताभिसरण मंदावल्यामुळे जखम भरत नाही, पण हे तंत्रज्ञान कृत्रिम रित्या त्या भागात रक्ताचा नवीन महामार्ग तयार करते. एकदा का पायाला रक्तपुरवठा पूर्ववत झाला की, शरीराची नैसर्गिक शक्ती ती जखम स्वतःहून भरून काढते. त्यामुळे रक्तशर्करा वाढून पायांना जखमा झाल्यास तात्काळ तो कापून टाकणे किंवा झिज झाल्यामुळे किंवा सांध्यात पाणी झाले असेल किंवा हाडात इजा झाली असेल तर लागलीच नी ट्रान्स्प्लांट किंवा गुडघ्याची वाटी बदलणे या मार्गाने जाण्याआधी एक प्रभावी पर्याय म्हणून एलिझारोव्हचा विचार निश्चितपणे करायला हवा. वेदनामुक्त आणि नैसर्गिक हालचालींनी परिपूर्ण आयुष्य जगण्यासाठी ही रशियन उपचारपद्धती रुग्णांना एक नवी उमेद देते.

**- डॉ. सुहास शहा,**
अस्थिरोगतज्ज्ञ,
संपर्क: ९३२२२३५०४२

## विद्युत वाहने धावतानाच होणार चार्ज

अमेरिकेतील इंजिनिअर्सनी एक मोठे यश मिळवले आहे, ज्यामुळे भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांना रस्त्यावर धावत असतानाच चार्ज करणे शक्य होणार आहे. त्यांनी या प्रणालीची यशस्वी चाचणीदेखील घेतली आहे. या चाचणीत एका अवजड इलेक्ट्रिक ट्रकला हायवेवर धावत असताना वायरलेस पद्धतीने चार्ज करण्यात आले. या यशस्वी चाचणीमुळे भविष्यात वाहतूक अधिक कार्यक्षम आणि स्वस्त होईल, तसेच इलेक्ट्रिक वाहनांना चार्ज करणे खूप सोपे होईल.



इंटरेस्टिंग इंजिनिअरिंगच्या अहवालानुसार, ही चाचणी इंडियानामधील वेस्ट लाफायेट येथील यू.एस. हायवे ५२/२३१ च्या एक चतुर्थांश मैलाच्या भागावर करण्यात आली. पर्ड्यू विद्यापीठाच्या संशोधकांनी हायवेच्या काँक्रिटखाली एक विशेष डायनॅमिक वायरलेस पॉवर ट्रान्स्फर सिस्टीम बसवली होती. याच सिस्टीमने इलेक्ट्रिक ट्रकला चालू असताना चार्ज केले. या चाचणीसाठी ८ इलेक्ट्रिक सेमी–ट्रक (अवजड ट्रक) या कॉईल सिस्टीमवरून ताशी ६५ मैल वेगाने चालवण्यात आला. अहवालानुसार, ट्रकने चालू असताना प्रभावीपणे १९० किलोवॅट वीज खेचली. ही वीज सुमारे १०० सामान्य घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या विजेच्या समान आहे. संशोधकांचे म्हणणे आहे की, हा निकाल सिद्ध करतो की ज्या संकल्पनेची दीर्घकाळापासून कल्पना केली जात होती, ती आता केवळ शक्यच नाही, तर मोठ्या प्रमाणावर लागूदेखील केली जाऊ शकते.

या सिस्टीममध्ये रस्त्याच्या खाली ट्रान्समीटर कॉईल्स बसवलेले असतात, जे एक चुंबकीय क्षेत्र तयार करतात. इलेक्ट्रिक सेमी–ट्रकमध्ये रिसीव्हर कॉईल्स ट्रकच्या चेसिसखाली बसवलेले असतात. जेव्हा ट्रक या कॉईल्सवरून जातो, तेव्हा वीज रस्त्याद्वारे थेट ट्रकमधील बॅटरी सिस्टीममध्ये हस्तांतरित होते. ट्रकमधील रिसीव्हर ही वीज खेचतो, ज्यामुळे बॅटरी चार्ज होते. या कॉईल्स खास करून काँक्रीटच्या रस्त्याच्या आत काम करण्यासाठी डिझाईन केल्या आहेत. कारण, अमेरिकेतील बहुतेक व्यस्त महामार्ग काँक्रीटचेच बनलेले आहेत.

## तिखटपणाबाबत विश्वविक्रम करणारी मिरची

'कॅरोलिना रिपर' ही जगातील सर्वाधिक तिखट मिरची म्हणून ओळखली जाते. 'गिनिज वर्ल्ड रेकॉर्डस्'नुसार तिचा तिखटपणा सरासरी १५ ते २२ लाख स्कोव्हिल हीट युनिटसब (SHU) इतका आहे. काही मिरच्या तर २३ लाख डकण पेक्षाही अधिक तिखट नोंदवण्यात आल्या आहेत.

ही मिरची अमेरिकेतील साउथ कॅरोलिनामधील कृषी तज्ज्ञ एड करी यांनी विकसित केली. लाल रंगाची, टोकाला विंचूसारखी शेपटी असलेली ही मिरची दिसायलाही आगळीवेगळी आहे. अत्यंत तिखट असतानाही तिच्यात किंचित गोडसर आणि फळांसारखी चव असल्याचे सांगितले जाते. कॅरोलिना रिपरमध्ये कॅप्सेसिन या घटकाचे प्रमाण अतिशय जास्त असते. हाच घटक तिखटपणा निर्माण करतो. जास्त प्रमाणातील कॅप्सेसिनमुळे जिभेवर तीव्र जळजळ, डोळ्यांत पाणी, घाम येणे आणि काही वेळा श्वसनास त्रास होऊ शकतो.



तज्ज्ञांच्या मते, अत्यल्प प्रमाणात घेतल्यास कॅप्सेसिनमुळे वेदनाशामक परिणाम, चयापचय वाढणे आणि अँटिऑक्सिडंट फायदे होऊ शकतात. मात्र कॅरोलिना रिपरसारखी अतितिखट मिरची जास्त प्रमाणात खाल्ल्यास पोटदुखी, उलटी, रक्तदाबात बदल किंवा गंभीर अस्वस्थता निर्माण होण्याचा धोका असतो. या मिरचीचा वापर सॉस, चटण्या किंवा तिखट पदार्थांत अत्यंत मर्यादित प्रमाणात केला जातो. स्वयंपाक करताना हातमोजे वापरणे, डोळे किंवा चेहऱ्याला हात न लावणे आणि लहान मुलांपासून दूर ठेवणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञ सांगतात. अत्यंत तिखट पदार्थ आवडणाऱ्या लोकांमध्ये कॅरोलिना रिपरला विशेष मागणी आहे. जगभरात 'स्पायसी चॅलेंजेस', सॉस उद्योग आणि खाद्यसंस्कृतीत या मिरचीने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिखटपणाचा कडेलोट गाठलेली कॅरोलिना रिपर ही केवळ मिरची नसून ती मानवी सहनशक्तीचीही एक कसोटी ठरते.

## याकुत्स्क... उणे ४५ अंश

जगात एक असे ठिकाण आहे जिथं ग्लासमधून पाणी हवेत फेकलं तर काही सेकंदातच त्याचा बर्फ होतो. हे ठिकाण म्हणजे रशियातील याकुत्स्क. इथं तापमान उणे ४५ अंश सेल्सिअस असतं. जगातलं सर्वात थंड शहर म्हणून या शहराची ओळख आहे.

या शहरात आणि आजुबाजूच्या परिसरात जिकडे बघाल तिकडे बर्फ असतो. इतकंच काय तर माणसांच्या डोळ्याच्या पापण्याही बर्फानं माखलेल्या असतात. बाजारात गेलात तर मासे वगैरेही उघडे असूनही गोठलेले! फ्रोजन फूड द्या, असं म्हणण्याची गरजच नाही. कारण प्रत्येक गोष्ट इथली गोठलेली असते. पापण्यांवर बर्फ तर आहेच, पण पुरुषांची दाढीही त्यातून सुटलेली नाही. तुम्ही गरम केलेलं पाणी आकाशात फेकलं तर खाली येईपर्यंत त्याचा बर्फ होतो. विशेष म्हणजे या खडतर स्थितीमधील शहराची लोकसंख्या हजारात नाही तर लाखात आहे.

जवळपास तीन लाख लोकसंख्येचं हे शहर आहे. हे शहर १६३२ मध्ये वसलं आणि १६४३ मध्ये त्याला शहराचा दर्जा मिळाला. हे शहर रशियन प्रांत साखामध्ये वसलेलं आहे. त्याच प्रांताच्या राजधानीचं हे शहर आहे. इथं व्यापार, उद्योग मोठ्या प्रमाणात आहे. डिसेंबर, जानेवारी आणि



फेब्रुवारी असे तीन महिने कडाक्याच्या थंडीचे असतात. बर्फ एक नाही दोन नाही तर २५ फुटांपर्यंत जमा होतो. असं असतानाही कुठेही ट्रॅफिक जाम होत नाही, आपल्याकडे धुक्यात धडकतात तशा गाड्या एकमेकांवर धडकत नाहीत. सगळं काही सुरळीत सुरू असतं. याकुत्स्कचं तापमान कधी कधी उणे साठीच्या खाली घसरतं. दोन वर्षांपूर्वी म्हणजे २०२३ मध्ये इथं तापमान उणे ६२ वर गेलं होतं. उन्हाळ्याच्या दिवसात ते ३० अंशांपर्यंत असतं. याकुत्स्क हे जगातल्या प्रमुख हिरे उत्पादक शहरांमध्ये मोडतं.

# 'आनंदऋषीजी'मध्ये सर्व रोग निदान शिबिरात १०५ रुग्णांची तपासणी

### आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ सुरू-निर्मला बाफना



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सर्व रोग निदान शिबिराचे उद्घाटन निर्मला बाफना व बाफना परीवार यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.

नगर– आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित आरोग्य शिबिराच्या माध्यमातून ब्लडप्रेशर, डायबेटीज व इतर अशा एकूण १०५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे आरोग्य मंदिर आहे.सध्याच्या युगात न परवडणारा औषधाचा खर्च यामुळे अनेक रुग्णांना उपचार मिळणे अवघड झाले आहे.मोफत आरोग्य शिबिरांमुळे अनेक गरजू रुग्णांना दिलासा मिळत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ सुरू आहे, असे प्रतिपादन निर्मल ग्रुपच्या निर्मला बाफना यांनी केले आहे.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे राष्ट्रसंत श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त ब्लड प्रेशर, डायबेटीज व इतर सर्व आजारांवर निदान चिकित्सा व साथीचे आजार व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन स्व. रमेशचंद्र बाफना व स्व. राहुल बाफना यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बाफना परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी शिबिराचे उद्घाटन निर्मला बाफना व बाफना परीवार यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी संतोष बाफना, रूपाली बाफना, ऋषभ बाफना, सौरभ बाफना तसेच जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, माणकचंद कटारीया, अभय गुगळे, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ. वसंत कटारिया, डॉ. गजेंद्र गिरी, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ. स्वप्नील शिंदे आदी उपस्थित होते.

रुपाली बाफना म्हणाल्या, जैन सोशल फेडरेशनने रुग्णसेवेच्या कार्यात बाफना परिवाराला सहभागी करून घेतले आहे. हे मी बाफना परिवाराचे भाग्य समजते. येथे येणाऱ्या रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा मिळावी. यासाठी येथील सर्व डॉक्टर्स नर्सेस व स्टाफ निस्वार्थपणे आरोग्य सेवा देत आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवेचे कार्य अविरतपणे सुरू आहे. येथे येणाऱ्या रुग्णांच्या चेहऱ्यावरचे हसू कायम राहो. सर्वांचा स्नेह व सहयोग सदा राहो.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, बाफना परिवारासारख्या दानशूर परिवारांच्या सहकार्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे भरविले जात आहेत. स्व. रमेशशेठ बाफना यांनी प्रतिकूल परिस्थितीत ४५ वर्षांपूर्वी निर्मल ॲडव्हर्टायझिंग हा व्यवसाय सुरू केला. बाफना परिवार हा पूर्वीपासूनच सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. तसेच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा प्रकल्पात ही बाफना परिवार पूर्वीपासून जोडला गेलेला आहे.जिथे कमी तिथे आम्ही याप्रमाणे बाफना परिवार नेहमीच सहकार्य करीत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात बाफना परिवारासारखे असंख्य परिवार सहभागी झाल्याने आनंदऋषीजी हॉस्पिटलचे न भुतो न भविष्यती असे काम उभे राहिले आहे.

डॉ. प्राजक्ता पारधे म्हणाले, उत्तम आरोग्य जीवनशैली जगण्यासाठी प्रत्येकाने वेळोवेळी आरोग्याची तपासणी करणे आवश्यक आहे. कोणताही आजार होऊ नये. यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक असतात. बीपी, शुगर, डायबेटीज तसेच सर्दी तसेच साथींचे आजार यासाठी रुग्णांनी काळजी घेणे आवश्यक आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्य शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले. या शिबिरात १०५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.



## गुरुवाणी - १२
## 'सामायिक' आवर्जून करा

जैन आगमात अतिशय महत्त्वाचे असलेल्या 'सामायिक'चे रहस्य आपण सगळ्यांनी समजून घेतले पाहिजे. ४८ मिनिटांचे सामायिक आत्मचिंतन, पाप मुक्ती असते, मन स्वच्छ होण्याची साधना असते. सामायिकसाठी अतिशय सहजतेने बसले पाहिजे. शरीर पूर्ण आराम अवस्थेत हवे. गुरूदेव संवत्सरीला सकाळी ८ वाजता चौरंगावर बसायचे आणि थेट ४ वाजता उठायचे. असे सलग आठ तास बसूनही त्यांचे पाय आखडत नव्हते, सांधे दुखत नसायचे. ते सहजपणे उठायचे. सामायिक म्हणजे प्रथम शरीर संतुलित करणे. हे संतुलन जमले पाहिजे. दुचाकी चालतानाच बॅलन्स राहते. थांबली तर बॅलन्स राहत नाही. शरीरही दुचाकी सारखेच आहे. चालले तरच संतुलन राहील. आरामखुर्चीत शरीराला आराम मिळतो असे म्हटले जाते. प्रत्यक्षात जे आरामखुर्चीत जास्त वेळ बसतात त्यांना आजार होण्याची शक्यता असते. भगवान महावीरांसारखे, गुरूदेवांप्रमाणे आसनस्थ झाला तर अशा समस्या अजिबात उद्भवणार नाहीत. सामायिक करताना आधी शरीर वेदना मुक्त करा. वेदनेची संवेदना नसली पाहिजे. दुःखची संवेदना दूर झाली की सुखाची संवेदना जागृत होते. तुम्हाला खूप तहान लागली आहे, पण समोर दूषित पाणी असेल तर आपण पीत नाही. त्याच पद्धतीने दोषयुक्त सामायिक उपयोगाची नाही. सामायिक म्हणजे अंगाचे सूक्ष्म संचालन. शरीर, मन उत्कृष्ट करण्यासाठी हे करायचे. आपल्या चुकांना, दोषयुक्त कर्म, पाप नष्ट करणे आणि आतून शुद्ध होणे म्हणजेच सामायिक होय. तपस्या करणारांनी विशेष करून हे लक्षात ठेवावे. तपस्या करताना अवडंबर करू नका. तुम्हाला गुरूकृपा हवीय हे लक्षात ठेवावे. एका सामायिक मध्ये कर्म सिद्धांताला सुद्धा खोटे ठरवण्याची ताकद असते. राजा श्रेणिक आपल्या कर्मामुळे नरकात जाणे पक्के होते. तो तीर्थंकरांना शरण गेला. त्यांनी राजाला नरक गती थांबवण्यासाठी किमान एक सामायिक करण्यास सांगितले. गुरूदेवांनी खऱ्या अर्थाने स्थानकवासी समाजाला एकत्र आणले. अनेक वर्षे त्यांनी श्रमण संघाचे सर्वोत्कृष्ट संचालन केले. इथं आपल्याकडे कुटुंबात दोन भाऊ एकत्र ठेवणे कठिण होते. गुरूदेवांनी अशी अद्भुत सामायिक केली की, अस्ताव्यस्त मोत्यांची सुंदर माला बनवली. नवीन रस्ते तयार नका करू पण आहे ते रस्ते उखडू नका. गुरूदेवांनी निर्माण केलेला संघ तोडण्याचे पाप करू नका.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# नागरदेवळेत १० ऑगस्ट रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त १० ऑगस्ट रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात पार पडणार आहे.

या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे.

या शिबिरामध्ये तज्ज्ञ नेत्ररोग डॉक्टरांकडून अद्ययावत यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. यासोबतच जेष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या देखील मोफत करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना एकाच ठिकाणी सर्वसमावेशक आरोग्य सेवा मिळणार आहे.

नेत्र तपासणीनंतर ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासेल, अशा रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यामध्ये मोतीबिंदू, काचबिंदू तसेच लहान मुलांच्या तिरळेपणावरील शस्त्रक्रियांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे, या शस्त्रक्रियेसाठी रुग्णांचे पुणे येथे येणे-जाणे, राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था मोफत करण्यात आली आहे.

या शिबिरासाठी नाव नोंदणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी जालिंदर बोरुडे (मो. ९८८१८१०३३३) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची निवड



नगर – राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

या नियुक्तीबाबत पक्ष नेतृत्वाने दादाभाऊ कळमकर यांच्यावर विश्वास व्यक्त करताना, पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी सर्व शक्तीनिशी योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

राज्यभर पक्षाची ताकद वाढविणे, तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ देणे आणि समाजातील सर्व घटक व विविध संघटनांना सोबत घेऊन पक्षाचे ध्येय-धोरण प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

# समर्पण चातुर्मासात ९ ऑगस्टला २.५ कोटी सामूहिक नवकार महामंत्र जाप कार्यक्रम



नगर – श्रद्धा, भक्ती आणि आत्मकल्याण असा त्रिवेणी संगम असलेला उपाध्याय प्रविणऋषी महाराज यांचा समर्पण चातुर्मास आनंदधाम परिसरात अतिशय भक्तीभावाने संपन्न होत आहे. तब्बल १७ वर्षांनंतर प्रविणऋषी महाराज आपल्या गुरूदेवांच्या पावन भूमीत चातुर्मास करत असल्याने भाविकांमध्ये अलोट उत्साह पहायला मिळत आहे. आचार्यश्री आनंदऋषी महाराज यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त श्री गुरू आनंद जन्मोत्सव सप्ताह साजरा होत आहे. याअंतर्गत उपाध्याय प्रविणऋषी महाराज यांच्या सान्निध्यात ९ ऑगस्ट रोजी सकाळी ७ ते १० यावेळेत आनंद तीर्थ समवशरण येथे सहपरिवार २.५ कोटी नवकार महामंत्र जाप होणार आहे.

२५ हजारांहून अधिक भाविक एकाचवेळी नवकार महामंत्राचा सामूहिक जाप करणार आहेत. यावेळी मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे उपसचिव आयएएस सुधीरकुमार कोचर यांचे जाहीर व्याख्यान होणार आहे, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया व कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली.

यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषी महाराज, आलोकऋषी महाराज, तिर्थेशऋषी महाराज, महासती सत्यप्रभा महाराज, महासती अमितज्योती महाराज आदी साधू-साध्वी उपस्थित असणार आहेत. २.५ कोटी नवकार महामंत्र जाप हा समर्पण चातुर्मासातील ऐतिहासिक क्षण ठरणार आहे. यावेळी भाविकांनी ग्लासभर पाणी सोबत आणायचे आहे. नवकार महामंत्र जापाची ऊर्जा या पाण्यात उतरते. अनुष्ठान झाल्यानंतर सदर पाणी श्रद्धेने प्राशन करायचे आहे. नवकार महामंत्र आत्मशक्ती जागृत करणारा आणि वातावरण मंगलमय करणारा मंत्र आहे. या मंत्रामुळे निर्माण होणारी अद्भूत अशी सकारात्मक ऊर्जा अद्वितीय असणार आहे. आचार्यश्रींच्या पवित्र भूमीत होणारा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरेल. जास्तीत जास्त भाविकांनी यात सहभागी होऊन समर्पण चातुर्मासात मनोभावे आराधना करावी.

श्री गुरू आनंद जन्मोत्सव सप्ताहात १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० यावेळेत आनंद एकासन, ११ व १२ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता आनंद दया, १२ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते ४ यावेळेत तपस्वींचा सामूहिक भावा आणि रात्री ८ वाजता भक्ती संध्या कार्यक्रम होईल. आचार्यश्रींच्या जन्मजयंती दिनी १३ ऑगस्ट रोजी गुरू गुणानुवाद तसेच अट्ठाई प्रत्याख्यान होईल. १४ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता पारणा उत्सव होईल.

समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी अहिल्यानगरचे सुपुत्र, उद्योगपती तसेच तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, प्रमिलाबाई बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

सामूहिक नवकार महामंत्र जाप व जन्मोत्सव सप्ताहातील कार्यक्रमांना भाविकांनी सहपरिवार उपस्थित राहावे असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी व कमिटीच्या सर्व सदस्यांनी केले आहे.

# नगरला इतिहास महाराष्ट्राचा महाअंतिम फेरी; राज्यभरातील ४५० बालकलाकारांचा सहभाग

नगर – बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती, मुंबई आयोजित इतिहास महाराष्ट्राचा हा महोत्सव इतिहासातील एका थोर विभूतीस दरवर्षी समर्पित केला जातो. यंदाच्या वर्षी हा महोत्सव पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना समर्पित करण्यात आला असून, राज्यभरातील २२ केंद्रांवर २३०० बाल कलावंतांनी यात आपली कला सादर केली. प्राथमिक फेरी केंद्रात झालेल्या या महोत्सवाची महाअंतिम फेरी घेण्याचा बहुमान बालरंगभूमी परिषद अहिल्यानगर शाखेला मिळाला आहे. ही महाअंतिम फेरी रविवार ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत माऊली सभागृह येथे संपन्न होणार आहे. यात महाराष्ट्रभरातून ४५० बाल कलावंत सहभागी होणार आहेत, अशी माहिती बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती, मुंबई अध्यक्ष ॲड. नीलम शिर्के-सामंत यांनी दिली.

नाट्य, नृत्य, संगीत आदी कलांच्या माध्यमातून राष्ट्रीय पुरुषांची व थोर विभूतींची सखोल माहिती बालप्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी आणि बालकांना त्यातून प्रेरणा मिळावी, या प्रमुख उद्देशापोटी हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. या महोत्सवात बालकलाकार नाट्य, नृत्य, गायन आणि वादनाच्या सादरीकरणातून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे प्रेरणादायी जीवनकार्य मांडत आहेत, असे अभिनेत्री तथा अध्यक्ष ॲड.निलम शिर्के-सामंत सांगितले.

या स्पर्धा महोत्सवाचे स्वरूप तीन गटांत असून यामध्ये एकल लहान गट, मोठा गट आणि सांघिक गट अशा विविध प्रकारांत (एकपात्री, नाट्यछटा, स्वगत, गाणी व नृत्य) बालकलाकार रंगमंचावर आपली कला सादर करणार आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात बृहन्मुंबई, अहिल्यानगर, जळगाव, नंदुरबार, जालना, नवी मुंबई, सोलापूर, पुणे, बीड, जळगाव, कोल्हापूर, लातूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, धुळे, कल्याण, ठाणे, मंगळवेढा, सोलापूर, सातारा, इचलकरंजी आदी केंद्रांवर प्राथमिक फेऱ्या पार पडल्या. यातून निवड झालेले ४५० हून अधिक बालकलाकार आता अहिल्यानगरमधील महाअंतिम फेरीत आमनेसामने असतील. या अंतिम फेरीचे परीक्षण ख्यातनाम अभिनेते व तज्ज्ञ परीक्षक संजय हळदीकर (कोल्हापूर), प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे (मुंबई) आणि अभिनेते दिगंबर नाईक पाहणार आहेत, अशी माहिती महोत्सव प्रमुख दीपाली शेळके यांनी दिली.

या महाअंतिम सोहळ्याला नाट्य व लोककला क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातून अंतिम फेरीत पोहचलेल्या बालकलाकारांच्या गुणवत्तापूर्ण सादरीकरणाचा आनंद घेण्याची सुवर्णसंधी नगरवासीयांना मिळणार आहे. या महोत्सवाला नगरवासियांनी व बाल प्रेक्षकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थितीत रहावे असे आवाहन बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती, मुंबईचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके, कार्यकारी मंडळ सदस्य अनंत जोशी, देवीप्रसाद सोहोनी व अहिल्यानगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष प्रसाद भणगे, शैलेश देशमुख यांनी केले आहे.

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त ९ ऑगस्टला सावेडीमध्ये 'सांस्कृतिक जल्लोष' चे आयोजन

### आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारी रॅली काढणार; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

नगर – जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी सेवा प्रतिष्ठानच्यावतीने ९ ऑगस्ट रोजी सावेडी उपनगरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, रॅली आणि आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आदिवासी समाजाची परंपरा, सांस्कृतिक वारसा, निसर्गाशी असलेले अतूट नाते आणि समाजाच्या हक्कांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उत्सव उत्साहात साजरा केला जाणार असून, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने आदिवासी समाजाचे निसर्गसंवर्धनातील योगदान, त्यांची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि जागतिक स्तरावरील महत्त्व लक्षात घेऊन ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून घोषित केला आहे. त्यानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही आदिवासी सेवा प्रतिष्ठानच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

९ ऑगस्ट रोजी सकाळी प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सांस्कृतिक मिरवणुकीला प्रारंभ होईल. ही मिरवणूक प्रोफेसर कॉलनी चौक, भिस्तबाग चौक, भिस्तबाग महाल मार्गे श्रेयस लॉनपर्यंत काढण्यात येणार आहे.

मिरवणुकीत आदिवासी युवक-युवती पारंपरिक वेशभूषेत सहभागी होणार असून, आदिवासी संस्कृतीची झलक सादर करणारे कमाडावना नृत्य, टिपऱ्या नृत्य, कांबड लोकनृत्य, फुगडी आणि इतर पारंपरिक लोकनृत्यांचे सादरीकरण हे विशेष आकर्षण ठरणार आहे. तसेच आदिवासी सांस्कृतिक गीतांचे सादरीकरण आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात ही मिरवणूक शहरवासीयांचे लक्ष वेधून घेणार आहे.

मिरवणुकीचा समारोप भिस्तबाग महाल शेजारील श्रेयस लॉन येथे होईल. त्यानंतर सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला सादरीकरण, व्याख्याने आणि समाजप्रबोधनपर उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध रानकवी तुकाराम धांडे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. आदिवासी सेवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्यास महानगरपालिका उपायुक्त एस. बी. तडवी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमात शिक्षण, क्रीडा, कला आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा गुणगौरव करून त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

## जनगणना करणाऱ्या शिक्षकांचे प्रलंबित मानधन तातडीने द्या; निधी असूनही मानधन न मिळाल्याने शिक्षकांमध्ये नाराजी



प्रसाद शिंदे

नगर – जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात शासनाच्या आदेशानुसार जबाबदारी पार पाडलेल्या शिक्षकांचे प्रलंबित मानधन व वेतन तात्काळ अदा करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक, शिक्षकेतर सेना यांच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांना देऊन त्वरित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णयानुसार पहिल्या टप्प्यातील कामकाजासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यांच्यामार्फत वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. या शासन निर्णयामध्ये जनगणना अधिकारी, कर्मचारी, प्रगणक, पर्यवेक्षक यांचे मानधन, प्रशिक्षण, प्रवास भत्ता आणि इतर खर्चासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक शिक्षकांनी शासनाच्या आदेशानुसार जनगणना-२०२७ चे काम अत्यंत जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे पूर्ण केले. मात्र शासनाकडून निधी उपलब्ध होऊनही संबंधित शिक्षकांना अद्याप मानधन किंवा वेतन अदा करण्यात आलेले नसल्याची बाब गंभीर असून त्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जनगणनेसारख्या राष्ट्रीय कामात शिक्षकांनी शैक्षणिक जबाबदाऱ्यांसोबत अतिरिक्त जबाबदारी स्वीकारून काम पूर्ण केले. मात्र त्यांच्या मेहनतीचा मोबदला वेळेत मिळत नसल्याने शासनाच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. शिक्षकांना त्यांच्या हक्काचे मानधन वेळेत मिळणे हा त्यांचा अधिकार असून याबाबत प्रशासनाने तत्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागाला तात्काळ सूचना देऊन उपलब्ध निधीतून जनगणना कार्यात सहभागी झालेल्या सर्व शिक्षकांचे प्रलंबित मानधन व वेतन त्वरित वितरित करावे. तसेच निधी वितरणाची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून भविष्यात अशा प्रकारचा विलंब होणार नाही, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक, शिक्षकेतर सेनेने केली आहे.

# अतिक्रमणावर महापालिकेने फिरवला बुलडोझर

### स्त्याकडेच्या संरक्षक भिंती केल्या जमिनदोस्त; कापड बाजारात एमजी रोडवरही प्रशासनाचा कडक पहारा



शिरसाठ मळा रस्त्याच्या कडेला अतिक्रमण करुन उभारण्यात आलेल्या संरक्षक भिंती जेसीबीच्या सहाय्याने पाडून टाकताना महापालिकेचे पथक.

नगर – महापालिकेने अतिक्रमणांविरोधात कठोर भूमिका घेतली असून, ७ ऑगस्ट रोजी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकाने रस्त्याकडेच्या संरक्षक भिंतीवर जेसीबी चालवून या भिंती जमिनदोस्त केल्या. तसेच कापड बाजारातील एम. जी. रोडवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून महापालिकेचे एक पथक दिवसभर ठाण मांडून होते. तर पोलिसांनीही गस्त घालून अतिक्रमण करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याचा इशारा दिला. त्यामुळे अतिक्रमणधारकांमध्ये मोठी खळबळ उडाल्याचे दिसून आले.

सावेडीतील जुना पिंपळगाव रोडकडून पाउलबुधे शाळेकडे जाणाऱ्या शिरसाठ मळा रस्त्याच्या कडेला अतिक्रमण करुन संरक्षण भिंती उभारण्यात आल्याची तक्रार महापालिकेच्या प्रभाग समिती क्रमांक १ कडे करण्यात आली होती. त्यानुसार महापालिकेच्या पथकाने जावून तेथे पाहणी केली असता अतिक्रमण असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर समितीच्यावतीने संबंधितांना नोटिसा देवून हे अतिक्रमण काढून घेण्याच्या सूचना केल्या होत्या. तथापि, या सूचनांकडे संबंधितांनी दुर्लक्ष केल्याने ७ ऑगस्ट रोजी महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या नेतृत्वात क्षेत्रीय अधिकारी देविदास बीज्ञा यांच्या पथकाने हे अतिक्रमण भुईसपाट करण्याची कार्यवाही केली.

हॉटेल सिटी प्राईडकडून पाउलबुधे शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यालगत विनापरवाना व अतिक्रमण करून तीन संरक्षक भिंती (वॉल कंपाऊंड) उभारण्यात आल्या होत्या. या रस्त्याच्या रुंदीकरण करण्याचे काम महापालिकेमार्फत हाती घेण्यात येणार असून, या भिंती त्यात मोठा अडथळा ठरत होत्या. अखेरीस महापालिकेच्या पथकाने आक्रमक पवित्रा घेत जेसीबीच्या साहाय्याने या भिंती पाडून टाकल्या.

दरम्यान, कापड बाजारातील एम.जी. रोडचे काम सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर ७ ऑगस्ट रोजी दिवसभर महापालिकेचे पथक तिथेच ठाण मांडून होते. तसेच पोलीस पथकानेही परिसरात सातत्याने गस्त घालून, कुणीही पुन्हा अतिक्रमण केल्यास त्यांच्यावर थेट गुन्हे दाखल करण्यात येतील असा सज्जड इशारा दिला. प्रशासनाच्या या कठोर भूमिकेमुळे दिवसभर हा रस्ता पूर्णपणे अतिक्रमणमुक्त दिसून आला. कापड बाजारात प्रशासनाने घेतलेल्या भूमिकेचे व्यापाऱ्यांनी स्वागत केले.

